
● पंढरपूर ● शनिवार, २८ डिसेंबर २०२४
● किंमत ₹ ४ ● पाने : ८

# पंढरी संचार

NO PAIDNEWS
pandharisanchar.com
RNI-MAH-MAR/1499/2000
● वर्ष २९ ● अंक - २१८



अकलूज नगरपरिषदेच्या आरोग्य विभागातील कर्मचारी नितीन पेटकर... PII



डॉ.मनमोहन सिंग यांच्या रूपाने भारताने एक मुत्सद्दी अर्थतज्ज्ञ गमावला.... PIII

## पंढरपूर शहर व तालुक्यात क्षयरोग तपासणी मोहिम

# 52 हजार जणांची होणार तपासणी

■ दत्तात्रय खटवटे

**पंढरपूर :** राज्यात क्षयरोग रुग्णांची संख्या वाढू नये यासाठी आरोग्य विभागाने खबरदारी घेतली असून २३ डिसेंबर ते ३ जानेवारी या कालावधीत पंढरपूर शहर व तालुक्यातील 52 हजार जणांची तपासणी करून क्षयरोग रुग्णांचा शोध घेण्यात येत आहे. यासाठी 25 पथके तैनात करण्यात आली आहेत. गोरगरीब नागरिक विविध कामे करतात. अनेकांना क्षयरोगाची लागण झालेली असते. मात्र वैद्यकीय उपचार महाग असल्यामुळे व काम बुडत असल्यामुळे ते आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. आरोग्याची तपासणी करून घेत नाहीत. यामुळे एका रुग्णापासून अनेक रुग्ण निर्माण होतात. म्हणून आरोग्य विभागाच्यावतीने प्रत्येक वर्षी दोन वेळा राज्यात क्षयरोग रुग्ण शोध मोहीम राबविण्यात येते. मात्र यंदाच्या वर्षी



प्रातिनिधीक फोटो 'पंढरी संचार'

लोकसभा व विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी असल्यामुळे आरोग्य विभागाला ही मोहीम राबविण्यात अडचण निर्माण झाली. म्हणून डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात ही मोहीम राविण्यात आली आहे. 23 डिसेंबर ते 3 जानेवारी या दहा दिवसात पंढरपूर शहर व तालुक्यातील 52 हजार जणांची तपासणी करण्यात येणार आहे. यासाठी आरोग्य विभागातील एक कर्मचारी, आशा वर्कर असे दोन जण प्रत्येक घरोघरी जाऊन संशयित रुग्णांची तपासणी करणार आहेत. यासाठी 25 पथके तयार करण्यात आली आहेत. पंढरपूर शहरात 13 हजार तर ग्रामीण भागातील 38 हजार रुग्णांची तपासणी करण्यात येणार आहे. गेल्या चार दिवसापासून ही तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. यामध्ये पंढरपूर शहरात १ तर ग्रामीण भागात ८ असे नऊ रुग्ण सापडले आहेत . सध्या पंढरपूर तालुक्यात ११४ रुग्ण असून यामध्ये पंढरपूर शहरात ४६ व ग्रामीण भागात ६८ रुग्ण आहेत. या रुग्णावर उपचार सुरू असून त्यांना औषधोपचार करण्यासाठी शासनाकडून महिन्याला १००० रुपये देण्यात येत आहेत. पंढरपूर तालुक्यात असलेल्या ९५ गावांमध्ये क्षयरोग मुक्त गाव मोहीम राबविण्यात येत आहे. यामध्ये चार गावे क्षयरोग मुक्त झाली आहेत. ही मोहीम जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉक्टर मीनाक्षी बनसोड, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉक्टर एकनाथ बोधले, उपजिल्हा रुग्णालय अधीक्षक डॉक्टर महेश सुडके यांच्या मार्गदर्शनाखाली योगीनाथ विजापुरे, शकील शेख, आरोग्य विभागातील कर्मचारी व अशा वर्कर राबवीत आहेत.

**रुग्णांना दत्तक घेण्याचे आवाहन**

● क्षयरोग झालेली व्यक्ती गरीब असल्याने ते उपचारासाठी खर्च करू शकत नाहीत. यामुळे समाजातील दानशूर व्यक्तीने एका रुग्णास दत्तक घेऊन त्याचा औषध उपचार व इतर खर्च करण्यास सहकार्य करावे असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## » At a Glance

### ९५ हजार शेतकऱ्यांनी भरला पीकविमा



**सोलापूर :** रब्बी हंगामातील प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी १६ डिसेंबर ही शेवटची तारीख होती. या तारखेपर्यंत सोलापूर जिल्ह्यात यंदा आतापर्यंत ९५ हजार १२४ शेतकऱ्यांनी विमा उतरवला असून, या विम्यामुळे जिल्ह्यातील १ लाख ४३ हजार ८६० हेक्टर क्षेत्रावरील पिके संरक्षित झाली आहेत.


सोलापूर जिल्ह्यात यंदा ४ लाख १३ हजार ६३६ हेक्टर क्षेत्रावर रब्बीची पेरणी झाली आहे. साधारण ८९. ७४ टक्के इतकी पेरणी झाली आहे. पीकविम्याबाबत शेतकऱ्यांमध्ये अलीकडच्या काही वर्षांत जनजागृती होत आहे.

### सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात मनाई आदेश लागू



**सोलापूर :** सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून दि. 29 डिसेंबर 2024 सकाळी 8 वा. पासुन ते 12 जानेवारी 2025 रात्री 8 वा. पर्यंत या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 37 (1) व 37 (3) (अ ते फ) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत, असे अपर जिल्हादंडाधिकारी मनिषा कुंभार यांनी कळविले आहे. या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्यासाठी वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेण्यास मनाई करण्यात येत आहे.

### चौपाड येथील धाडीत सापडला प्लास्टिकचा मोठा साठा



**सोलापूर :** सोलापूर महानगपालिकेकडून प्लास्टिक बंदी कायद्याची जोरदार अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. आज सोलापुरातील चौपाड येथे असलेल्या अरिहंत फार्मच्या प्लास्टिक पिशव्यांच्या गोडाऊनवर धाड टाकून मोठा प्लास्टिकचा साठा जप्त केला आहे. महापालिकेच्या आरोग्य पथकाने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत येथे काही वेळापूर्वी धाड टाकली आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक पिशव्या ज्याला कायद्याने बंदी आहे. त्याची पोतीच्या पोती सापडली आहेत. अधिकाऱ्यांकडून संबंधितांवर कारवाई करण्याचे काम अद्याप चालूच आहे.

### वटवृक्ष मंदिरात हर्षोल्हासाने नुतन वर्षाचे स्वागत!



**अक्कलकोट :** नुतन वर्षाच्या स्वागताकरीता पाश्चिमात्य संस्कृतीच्या चालीरितींना फाटा देत कोल्हापूर, मुंबई व राज्यातील विविध भागातील स्वामी भक्तांच्या वतीने अक्कलकोट येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानात सालाबादाप्रमाणे विविध धार्मिक कार्यक्रमांनी हर्षोल्हासात नुतन वर्षाचे स्वागत होणार असल्याची माहिती मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी दिली.

## आ. आवताडे यांनी अधिकाऱ्यावर करडी नजर ठेवावी; जनतेची मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात नागरिकांनी मतदान करून आमदार समाधान आवताडे यांना विजयी केले आहे. यामुळे आमदार अवताडे यांच्याकडून नागरिकांच्या कामाच्या अपेक्षा वाढल्या आहेत. विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी नागरिकांच्या कामाकडे दुर्लक्ष करत आहेत. यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे आमदार समाधान आवताडे यांनी शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर करडी नजर ठेवावी अशी मागणी जनतेतून होत आहे. शासकीय कार्यालयात विविध कामासाठी नागरिक शेतकरी विद्यार्थी महिला यांना जावे लागते. मात्र अधिकारी व कर्मचारी काम करण्यास टाळाटाळ करतात. तसेच कार्यालयात गैरहजर असल्याचे दिसून येत आहेत. शासकीय कार्यालयास शनिवार, रविवार सुट्टी आहे. मात्र शासकीय अधिकारी व कर्मचारी शुक्रवारी सकाळी हजेरी लावून निघून जातात. ते कार्यालयात हजर नसतात. मोबाईल वर संपर्क साधला असता मोबाईल उचलला जात नाही. यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. तरी आमदार समाधान आवताडे यांनी प्रत्येक शासकीय कार्यालयावर करडी नजर ठेवून अधिकारी व कर्मचारी नागरिकांची कामे वेळेत करतात की नाही याची पाहणी करावी. तसेच दर शुक्रवारी कार्यालयास अचानक भेट देऊन किती अधिकारी उपस्थित असतात व किती गैरहजर असतात याची पाहणी करून गैरहजर राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात निवडणूक

» पान ३ वर



### मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे देशाची मोठी हानी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** भारताचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे निधन झाल्याने देशाची मोठी हानी झाली असल्याची प्रतिक्रिया सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी दिली आहे. प्रणिती शिंदे म्हणाल्या की देश आर्थिक दृष्ट्या स्थिर आणि सक्षम होण्यासाठी मनमोहन सिंग यांचे योगदान मोलाचे आहे. मी त्यांना नेहमीच जवळून पाहिले आहे. त्यांच्या निधनामुळे मी त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे.

## विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा मुख्य दरवाजा चांदीचा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** राज्यातील कोट्यावधी भाविकांचे विठ्ठल रुक्मिणी आराध्य दैवत असल्यामुळे येणारे भाविक विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीला देणगी देतात. मात्र एका भाविकांनी विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा मुख्य दरवाजा चांदीने मढवून देणार असल्याचे सांगितले आहे. याचे काम सुरू झाले असून यासाठी ३० लाख रुपये खर्च येणार आहे. पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनासाठी वर्षाला १ कोटी होऊन अधिक भाविक येतात. आलेले भाविक विठ्ठल रुक्मिणी चरणी दान अर्पण करतात. यातून त्यांना सुख समाधान व आनंद मिळतो. यामुळे मंदिराच्या उत्पन्नात वाढ होत आहे. विठ्ठल रुक्मिणी मंदिर आकर्षक दिसावे व संवर्धन व्हावे यासाठी शासनाने १५० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. यातून विठ्ठल रुक्मिणी मंदिरात संवर्धनाचे व सुशोभीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा मुख्य दरवाजा पितळी आहे. यामुळे या दरवाज्यास

» पान ३ वर

## विठ्ठल रुक्मिणी च्या नित्य पूजा एका दिवसात हाऊसफुल्ल

### मंदिर समितीला 1 कोटी 80 लाखाचे उत्पन्न मिळणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना विठ्ठल रुक्मिणीची नित्य पूजा, पाद्यपूजा, तुळशी अर्चन पुजा करण्याचा मान मिळावा यासाठी विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने 26 डिसेंबर रोजी 1 जानेवारी 2025 ते 31 मार्च 2025 या तीन महिन्याच्या कालावधीसाठी नित्य पूजा ऑनलाइन बुकिंग करण्याचे आवाहन करण्यात आले होते. यास भाविकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला असून एका दिवसात तीन महिन्याच्या पूजा हाउसफुल झाल्या आहेत. या पूजेतून विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला १ कोटी ८० लाख रुपयाचे उत्पन्न मिळणार आहे. पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनासाठी वर्षाला एक कोटीहून अधिक भाविक येतात. आलेल्या भाविकांना विठ्ठलाची नित्य पूजा, पाद्यपूजा, तुळशी अर्चन पूजा करण्याची इच्छा असते. यामुळे मंदिर समितीने भाविकांसाठी नित्य पूजा करता याव्यात. यासाठी 26 डिसेंबर रोजी ऑनलाईन बुकिंग करण्याचे आवाहन भाविकांना केले होते. यास चांगला प्रतिसाद मिळाला असून पहिल्याच दिवशी तीन महिन्याच्या सर्व पूजा हाउसफुल

» पान ३ वर






**सोलापूर** : गाडी अशी कशी ओव्हरटेक करतो, तुला काय अक्कल वगैरे आहे का, असे म्हणताच ट्रक ड्रायव्हरने गाडीतून उतरून शिवीगाळ करत ग्रामसेवकास लाथाबुक्क्याने व लोखंडी गजाने मारहाण केली. ही घटना, २५ डिसेंबर रोजी सायं ५ वाजता कुडूवाडी बार्शी रोडवर म्हैसगाव येथील ओंकार शुगर साखर कारखान्याजवळ घडली. याबाबत ग्रामसेवक हनुमंत आदिनाथ बनाते (रा. बार्शी) यांनी ट्रकचालकाविरुद्ध फिर्याद दाखल केली आहे. अधिक तपास पोलिस करीत आहेत.

## मोबाईलमुळे मैदानी खेळाचे महत्व कमी...

# मैदानी खेळामुळे मानसिक,शारीरिक स्वास्थ्य चांगले राहते- सौ. दोशी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** अभ्यासाबरोबर खेळायला ही अतिशय महत्त्व आहे ज्या खेळाची आपल्याला आवड आहे तो खेळ जिद्दीने खेळला तरच आपण जिल्हास्तर राज्यस्तर देशपातळीवर यश मिळवू शकतो मैदानी खेळामुळे मानसिक शारीरिक स्वास्थ्य चांगले राहते सध्या मोबाईलचा वापर वाढल्यामुळे विद्यार्थी बराच काळ घरात बसून मोबाईलवर गेम खेळतात त्यामुळे मैदानी खेळांचे महत्त्व कमी झाले आहे मोबाईल आवश्यक आहे परंतु त्याचा गरजेपुरता वापर करणे अतिशय आवश्यक आहे.

**शांतिनिकेतन ची आठवण करून देणाऱ्या निसर्गरम्य वातावरणातील शाळा- सी.ए. निलेश मर्दा**

या शाळेमध्ये येण्याचा योग क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने आला .आज आपण सहज पाहिले तर आपल्यामध्ये वेगवेगळ्या तीन स्तरांचे लोक आहेत बाल, तरुण व काही ज्येष्ठ मंडळी आहेत आपल्यामध्ये कोणी, उद्योग , व्यवसायिक, नोकरी , परीक्षार्थी व विद्यार्थी बसलेले आहेत पण प्रत्येकाला प्रत्येकाचे काम सुरू करण्यापूर्वी त्याची पूर्वतयारी करावी लागते. त्यासाठी सातत्य ,सराव अतिशय महत्त्वाचा असतो कारण त्यातून अनेक अनुभव येतात आणि आपण तयार होतो त्यातून आपल्याला प्रतिस्पर्ध्याची चाल ओळखता येते. खेळाडू चिरकाल तरुण, निरोगी असतात आणि निरोगी शरीरामध्ये निरोगी मन वास करते. खेळामुळे शारीरिक समृद्धी प्राप्त होते.

प्रत्येकाला जय पराजय खेळाडू वृत्तीने स्वीकारता आला पाहिजे माणूस कितीही वेळा हरला तरी फिनिक्स प्रमाणे झेप घेणे महत्त्वाचे असते तर आणि तरच आकाशाला गवसनी घालता येते असे मत श्री.रविंद्र डुडू यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी खेळाकडे करीअर म्हणून पहावे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच खेळाकडे पूर्णपणे लक्ष देणे गरजेचे आहे असे केल्यास विद्यार्थी खेळात आपले करिअर बनवू शकतात. शरीर व मन तंदुरुस्त राहण्यासाठी दररोज व्यायाम करणे आवश्यक आहे. शालेय जीवनापासून व्यायामाच्या सवय लावणे खूप महत्त्वाचे आहे. दररोज मैदानी खेळ खेळल्याने आत्मविश्वाससही वाढतो . एखादा विद्यार्थी खेळामध्ये यश संपादन करून क्लास वन अधिकारी बनू शकतो.

**विद्यार्थ्यांनी खेळाकडे करीअर म्हणून पहा- श्री अनंतलाल दोशी दादा**

येथील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तर, राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये यश मिळवून स्वतःबरोबर शाळेचे नाव उज्वल केले आहे यापुढेही त्यांनी क्रीडा स्पर्धांमध्ये आपले नाव देशपातळीवर न्यावे. यासाठी शाळा त्यांना हवी ती मदत करेल असे आश्वासन दिले. यावेळी विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक अशी योगा प्रात्यक्षिके करून दाखविली .यावेळी क्रीडा शिक्षिका स्वाती शेंडगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मैदानाचे उद्घाटन करून स्पर्धेची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमासाठी संचालक चंद्रप्रभू प्रा.बि.शे.स. पतसंस्था नातेपुते मा. श्री रवींद्र डुडू, संस्थापक अध्यक्ष रत्नत्रय परिवार,मा श्री. अनंतलाल दोशी, सी.ए. पंढरपूर श्री निलेश मर्दा,अध्यक्ष जैन सोशल ग्रुप,फलटण सौ.सविता दोशी , संस्थेचे मार्गदर्शक श्री. वीरकुमार दोशी , संस्थेचे सचिव श्री प्रमोद दोशी , चेअरपर्सन दहिगाव श्री.अमित गांधी, चेअरपर्सन दहिगाव श्री.रौनक चंकेश्वरा, सभापती नातेपुते श्री.वैभव शहा, श्री.सनत कुमार दोशी, श्री.रामदास करणे, श्री.सुरेश धाईंजे,बबन गोफने श्री.ज्ञानेश राऊत, इ.प्रशाला समिती सदस्य, मुख्याध्यापक दैवत वाघमोडे ,सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक सविता देसाई व सूत्रसंचालन अमृता मोहिते यांनी केले.

## तोतया आयपीएस अधिकारी अटकेत



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस** : भा आपण आयपीएस अधिकारी असल्याचे भासवत माळशिरस (जि. सोलापूर) तालुक्यातील एका संशयित युवकाने कराड शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत 13 जणांना सुमारे 70 ते 80 लाखांना गंडा घातला असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे शासकीय खात्यात नोकरी लावण्याचे आमिष दाखवत संशयिताने फसवणूक करत पंतप्रधान कार्यालय, महाराष्ट्र शासन, राज्य पोलीस यांच्या नावाने बनावट मेल काढून तसे मेल गंडा घातलेल्या युवकांना पाठविले असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. याबाबतचा अधिक तपास पोलिसांकडून करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

## Selected

## डोणगावकरांच्या समस्या सोडवू



**सोलापूर :** विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर आमदार सुभाष देशमुख यांनी दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघामधील डोणगाव येथे भेट दिली. यावेळी देशमुख यांनी विधानसभा निवडणुकीत नागरिकांनी त्यांच्यावर दाखवलेल्या विश्वासासाठी त्यांचे आभार मानले. तसेच देशमुख यांनी ग्रामस्थांच्या सर्व समस्या, अडचणी सोडवण्याचे आश्वासन त्यांना दिले. यावेळी राम जाधव, वृषाली पवार, बाबा आमले, संजय भोसले, भास्कर मस्के, सुनील टोपणे, अण्णा पाटील, धनंजय गायकवाड, कोंडिबा जगदाळे, मारुती कांबळे, बाळासाहेब पाटील, विजय आसबे, नाना कोलते उपस्थित होते.

## आ. सुभाष देशमुख यांनी साधला बेलाटीकरांशी संवाद



**सोलापूर :** दक्षिण सोलापूर मतदारसंघातील मतदारांनी मला सलग तिसऱ्यांदा सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल आपण जनतेशी संवाद साधण्यासाठी आणि आभार व्यक्त करण्यासाठी बेलाटी येथे भेट दिली असल्याचे आमदार सुभाष देशमुख यांनी सांगितले. यावेळी त्यांनी ग्रामस्थांशी आपुलकीने संवाद साधत त्यांच्या विश्वासाबद्दल मनःपूर्वक आभार मानले. याप्रसंगी तालुकाध्यक्ष राम जाधव, महिला तालुकाध्यक्ष वृषाली पवार, प्रभू राठोड, निर्मला कुंभार, माणिक नरोटे, राहूल पवार, सुनील काटकर, श्रीकांत पाटील, अण्णासाहेब पाटील, महादेव वावरे, नितीन घवणे उपस्थित होते.

## लक्झरी बसचा भीषण अपघात



**मंगळवेढा :** मंगळवेढा सांगोला रस्त्यावर लक्झरी बसचा अपघात झाला. शालेय सहल घेऊन निघाली होती लक्झरी बस झाली. आज पहाटेच्या सुमारास घडला अपघात झाला. लातूरच्या शाळेची होती सहल, लक्झरी बस मध्ये होते तब्बल 39 विद्यार्थी बस मधील सर्व विद्यार्थी आणि शिक्षक सुखरूप, विद्यार्थी बचावले मात्र बसचे नुकसान झाले. भीषण अपघात झाल्याची घटना मंगळवेढा रोडवर घडली आहे.

## ढेंबरेवाडीतून वाघाचे स्थलांतर



**बार्शी :** मागील आठ दिवसांपासून वन विभागाच्या कॅमेऱ्यात कैद होणाऱ्या वाघोबाचे ढेंबरेवाडीतून वाघाने कारी शिवारात प्रवेश केला. वाघाचे प्रत्यक्ष दर्शन गुरुवारी कारी (ता. धाराशिव) येथे झाले असून, गावामध्ये वाघ आल्याचे समजताच गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बालाघाटच्या पायथ्याशी असलेल्या कारीतील सातनाकच्या शेतामध्ये वाघ दिसला. वाघाच्या ठशांचा मागोवा घेत वन विभागाकडून शोधमोहीम सुरू आहे.

# अकलूज नगरपरिषदेच्या आरोग्य विभागातील कर्मचारी नितीन पेटकर अॅन्टी करप्शनच्या जाळ्यात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** अकलूज नगरपरिषदेत स्वच्छता निरिक्षकाला कामाच्या मंजुरीसाठी दोन लाख रुपयांची मागणी केल्यावरुन लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई करीत ताब्यात घेतले.

याबाबत अधिक माहिती अशी,नितीन सिद्राम पेटकर वय ४० वर्षे रा.अक्कलकोट हे सध्या अकलुज नगरपरीषदेमध्ये आरोग्य निरीक्षक पदावर काम करीत होते.तक्रारदार यांची श्री गणेश इंडस्ट्रीयल सर्व्हिसेस, बारामती नावाची कंपनी नगरपालिकांना साफ सफाई व इतर कामांकरीता मनुष्यबळ पुरवठा करते. सदर कंपनीच्या वतीने विविध आस्थापनांशी समन्वय साधुन टेंडर भरणे, मनुष्यबळ पुरवणे,पत्रव्यवहार करणे, वेतनासाठी निधी प्राप्त करून घेणे इ.शासकीय कामे करतात.

अकलूज नगर परिषदेने शहरातील रस्ते,बाजारपेठा, गाळे, शौचालय साफ सफाई करणेकामी मनुष्यबळ पुरवठा करणेकरीता प्रसिध्द केलेले निविदा श्री गणेश इंडस्ट्रीयल सर्व्हिसेस,बारामती यांना मंजुर झाले.कंपनीने मनुष्यबळ पुरवठा केला होता.निविदा दर मंजुर करून वर्क ऑर्डर देताना नितीन पेटकर यांनी तक्रारदार यांचेकडे कामगारांच्या मासिक वेतनाच्या बिलाच्या तीन टक्के रक्कम व वर्क ऑर्डर मंजुरीसाठी म्हणजेच सुमारे १ लाख ९५ हजार रूपये लाचेची मागणी केली.त्यावरुन स्वच्छता निरिक्षक नितीन पेटकर यांचे विरूध्द अकलूज पोलीस ठाणे,सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कामगिरी पोलीस निरिक्षक गणेश पिंगुवाले,पोलीस अंमलदार कोळी, पो. ना. संतोष नरोटे, पोह. राहुल गायकवाड या लाच लुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

## सन्मान...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सांगोला :** सांगोल्याच्या शेवटचं टोक म्हणजे डिकसळ येथील ऊसतोड कामगारांचा मुलगा शशिकांत जगू चव्हाण याने परिस्थितीशी झुंज देऊन राज्यस्तरीय क्रॉसकंट्री स्पर्धेत यशस्वी गरुड झेप घेत, द्वितीय क्रमांक पटकावित यशाचा मानकरी ठरला आहे. म्हणून या निमित्ताने शिवसेना नेते मा. आम. दीपकआबा साळुंखे पाटील यांनी विजेत्या तरुणाचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला आहे.

## बावीस वर्षीय विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मंगळवेढा** : भरधाव दोन दुचाकींची जोराची धडक होऊन कारमध्ये तिहेरी अपघातात अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकत असलेल्या एका २२ वर्षीय विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात सांगोला-पंढरपूर रोडवरील मांजरी (देवकाटे वाडी) पाटीजवळ घडला. सुनील संजय मोटे (२२, रा. मारोळी, ता. मंगळवेढा) असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. या अपघातात दोन दुचाकींवरील दोन विद्यार्थ्यांसह पती-पत्नी जखमी झाले असून त्यांच्यावर सांगोल्यात खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## ऊस वाहतुकीचा ट्रेलर पलटी; कांही काळ वाहतुकीची कोंडी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**करमाळा :** उजनी लाभक्षेत्रालगत कुंभेज फाटा ते जिंती मार्गावर साखर कारखान्याकडे ऊस घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरला अनधिकृतपणे दोन दोन ट्रॉली लावून एका ट्रॉलीत तब्बल २० टन उसाची वाहतूक केली जात असल्याने रात्रीच्या वेळी या मार्गावर उसाच्या फडातून काढलेल्या ट्रॉली रस्त्यावरच पलटी होत आहेत. उसाने भरलेल्या ट्रॉली रस्त्यावर उभ्या केल्याने अपघात होऊन अनेकांना जीव गमवावा लागत आहे. तर कित्येक वाहनचालक गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातांमुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला गाड्यांच्या रांगा लागल्याचे दिसत होते. काही वेळानंतर पोलिसांनी सदर अपघातग्रस्त वाहने बाजूला करुन वाहतुक सुरळीत करण्यात यशस्वी झाले.

# लाखो भाविकांनी घेतले यल्लमा देवीचे दर्शन कासेगाव येथील यात्रा उत्साहात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर** : पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथील यल्लमा देवीच्या यात्रेत लाखो भाविकांनी देवीचे दर्शन घेतले. उत्साहात यात्रा सुरू झाली असल्याचे दिसून आले. या यात्रेसाठी महाराष्ट्र ,कर्नाटक, आंध्र प्रदेश येथील लाखो भाविक दाखल झाले होते. कासेगाव येथील यल्लमा देवीच्या यात्रेसाठी लाखो भाविक येत असल्याने भाविकांना सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी दोन दिवसांपूर्वी प्रशासनाची बैठक घेऊन सोयी सुविधा द्या अशा सूचना दिल्या होत्या. त्यानुसार प्रशासनाने भाविकांना सुविधा दिल्या असल्यामुळे भाविकातून समाधान व्यक्त होत आहे. गुरुवार, शुक्रवार, शनिवार असे तीन दिवस यात्रा सुरू राहणार आहे. शुक्रवारी यात्रेचा मुख्य दिवस असल्यामुळे लाखो भाविकांनी देवीस नैवेद्य अर्पण केला. तसेच अनेक भाविकांनी धार्मिक कार्यक्रम केले. या यात्रेसाठी तृतीयपंथी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहिले होते. यात्रा कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. भाविकांच्या सोयीसाठी पंढरपूर बस आगाराने जादा बसेस सोडल्या होत्या. आई राजा उदो उदो च्या गजरात यात्रा उत्साहात सुरुवात झाली आहे. यात्रेसाठी आलेले भाविक विविध वस्तू खरेदी करतात. म्हणून कासेगाव मध्ये विविध प्रकारचे स्टॉल्स उभा राहिले होते. प्रत्येक वर्षी यात्रा कालावधीत थंडीचा सामना भाविकांना करावा लागतो. मात्र यंदाच्या वर्षी ढगाळ वातावरण असल्यामुळे थंडी जाणवली नाही.






## तहसील कार्यालयात ग्राहक दिन साजरा

# एखादी वस्तू खरेदी करताना पावतीचा आग्रह धरा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** ग्राहक व नागरिक यांनी एखादी वस्तू खरेदी करताना पावतीचा आग्रह धरला पाहिजे. कारण पावतीशिवाय कुठलीही तक्रार चालत नाही. ज्या ठिकाणी पैसे घेऊन व्यवहार केला जातो. त्या सर्वांना ग्राहक संरक्षण कायद्यानुसार पावती देणे बंधनकारक आहे. आणि पावती घेणे हा नागरिकांचा हक्क आहे. याकरता नागरिकांनी जागरूक राहून पावतीच्या आग्रह धरला पाहिजे असे प्रतिपादन अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे तालुका उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे यांनी केले. 26 डिसेंबर हा राज्यभर ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो. ग्राहक दिनाचे आयोजन तहसील कार्यालय पंढरपूर या ठिकाणी करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष तहसीलदार लंगोटे तर प्रमुख पाहुणे म्हणून नंदकुमार देशपांडे हे होते. प्रारंभी अखिल भारतीय ग्राहक पंचायत व सर्वांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन तहसीलदार लंगोटे यांच्या हस्ते नंदकुमार देशपांडे यांच्या हस्ते तसेच सदस्यांच्या हस्ते करण्यात येऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रारंभी ग्राहक दिनाबद्दल प्रास्ताविक आझाद अल्लापुरकर यांनी केले. नागरिकांच्या हितासाठी ग्राहक संरक्षण कायदा लागू झालेले ग्राहकाला त्याच्या बद्दल जाणीव झाली असून त्याकरता नागरिकांनी एखादी वस्तू खरेदी करताना पावतीचा आग्रह करून घेतला पाहिजे. वस्तू खरेदी केलेली त्याची पावती घेतली पाहिजे ही वस्तू खराब निघाल्यास बदलून घेण्याचा अधिकार ग्राहकास आहे. तो ते दुकानदार नाकारू शकत नाही. याकरता नागरिकांनी जागरूक राहिले पाहिजे असे नंदकुमार देशपांडे यांनी सांगितले. ग्राहक संरक्षण कायदा हे ग्राहकाचे कवच असून यामुळे ग्राहकाला फायदा मिळाला. यापूर्वी ग्राहकाने एखादी वस्तू खरेदी केली तर त्याला तो बदलून मिळण्याचा अधिकार नव्हता. परंतु



नागरिकांसाठी ग्राहकांसाठी करण्यात आलेल्या कायद्यामुळे व्यक्तीला आधार मिळाला असून यासाठी नागरिकांनी सजग राहिले पाहिजे. त्याने पावती घेतली पाहिजे. आज समाजामध्ये ग्राहक पंचायती सारखी संघटना काम करते आहे. त्यांच्या माध्यमातून अनेकांचे प्रश्न मार्गी लागले आहेत असे अध्यक्ष भाषण तहसीलदार सचिन लंगोटे यांनी सांगितले. आलेल्या सर्वांचा सत्कार गुलाब पुष्प देऊन तहसीलदार लंगोटे यांनी केला तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आझाद अल्लापुरकर यांनी केले. या कार्यक्रमास ग्राहक पंचायत सदस्य सतीश निपाणकर, सागर कारंडे, विभुते, विभागाचे अधिकारी कुंभार तसेच देठे सचिन, सागर शिंदे, सुरज सरवदे यांचे सह तहसील कार्यालयातील विविध खात्याचे कर्मचारी नागरिक उपस्थित होते. शेवटी सर्वांचे आभार तहसीलदार लंगोटे यांनी मानले.

**सोलापूर** : सोलापुरातील गिरी झोपडपट्टी परिसरातील दत्तनगर येथील सतरा वर्षीय अल्पवयीन मुलगी 23 डिसेंबर रोजी दुपारी बाराच्या सुमारास बेपत्ता झाली आहे. तिच्या कुटुंबीयांनी इतरत्र शोध घेतला पण ती सापडली नाही. तिला कोणीतरी फुसलावून पळून नेण्याची फिर्याद तिच्या कुटुंबीयांनी जेलरोड पोलिसात दिली आहे. पोलीस हवालदार बी. बी. घुगे तिचा शोध घेत आहेत.

## स्वेरीमध्ये भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली अर्पण

# डॉ.मनमोहन सिंग यांच्या रूपाने भारताने एक मुत्सद्दी अर्थतज्ज्ञ गमावला - मंजुषा मिसकर

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर** : आधुनिक भारताच्या उभारणीचे शिल्पकार असलेले माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी आयोजिलेल्या आर्थिक धोरणामुळे भारत देश आज जगात एक आर्थिक महासत्ता म्हणून उभा राहत आहे. कै. डॉ.मनमोहन सिंग यांनी देशासाठी दिलेले योगदान हे अतुलनीय आणि अविस्मरणीय असे आहे. डॉ. सिंग यांच्या रूपाने भारताने आज एक मुत्सद्दी अर्थतज्ज्ञ गमावला आहे.' असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय अध्यक्षा श्रीमती मंजुषा मिसकर यांनी केले.



**पंढरपूर** : भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली वाहताना विभागीय अध्यक्षा श्रीमती मंजुषा मिसकर, सोबत डावीकडून रवी सुर्वे, डॉ.के. बी. पाटील, डॉ. यशपाल खेडकर, स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, श्रीमती मिसकर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सौ. स्वाती हवेली, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, डॉ. एस. पी. पवार.

भारताचे माजी पंतप्रधान व जेष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.मनमोहन सिंग यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनामुळे स्वेरीमध्ये जेष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.मनमोहन सिंग यांच्या प्रतिमेचे पूजन अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय अध्यक्षा श्रीमती मंजुषा मिसकर यांच्या हस्ते करण्यात आले. श्रीमती मंजुषा मिसकर ह्या मुख्याध्यापक व प्राचार्यांच्या एका महत्वाच्या सहविचार सभेच्या संदर्भात स्वेरीत उपस्थित होत्या. यावेळी त्या श्रद्धांजली पर भाषणात भारताचे माजी पंतप्रधान कै. डॉ.मनमोहन सिंग यांच्या कार्यावर प्रकाश टाकत होत्या. प्रथम वर्ष इंजिनिअरींगचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांच्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती दिली. यावेळी सोलापूर जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सौ. स्वाती हवेली, सोलापूर जिल्हा शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष रवी सुर्वे, स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.एम.एस. मठपती, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. एम.पी.ठाकरे, प्रशासन अधिष्ठाता डॉ.आर.आर. गिड्डे, पब्लिसिटी व प्रोटोकॉल अधिष्ठाता डॉ. डी.एस.चौधरी, संशोधन विभागाचे अधिष्ठाता डॉ. ए.पी. केने, अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता डॉ.के. बी. पाटील, प्लेसमेंटचे अधिष्ठाता प्रा. ए.ए.मोटे, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. एस.पी.पवार, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. एस.बी.भोसले, वर्कशॉप इन्चार्ज प्रा. बी. डी. गायकवाड, प्रा. डी.टी. काशीद, प्रा. एस.एस. गायकवाड, प्रा.विक्रम चव्हाण, रजिस्ट्रार राजेंद्र झरकर, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्रा.ए.एस.भातलवंडे, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी अमोल रोंगे, बालाजी सुरवसे, अमोल रोंगे आदी उपस्थित होते.

## लग्न करण्याच्या उद्देशाने अल्पवयीन मुलीला पळवून नेले



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : दुचाकीवरून आलेल्या दोघांनी बलुते मागण्यासाठी घराबाहेर पडलेल्या महिलेला ढकलून देऊन तिच्या अल्पवयीन मुलीला लग्न करण्याच्या उद्देशाने जबरदस्तीने दुचाकीवर बसवून पळवून नेले. याबाबत, फिर्यादीने फिर्याद दिली. त्यावेळी रस्त्याने ये-जा करणाऱ्या लोकांकडून आई परिसणा ही मंगल कार्यालयाजवळ आरडाओरड करत थांबल्याचे समजल्याने फिर्यादी व तिचा नवरा हे तेथे गेले. यावेळी आई रडत थांबली होती. म्हणून तिला काय झाले, मुलगी कुठे दिसत नाही, असे विचारले. तिने दुचाकीवरून आलेल्या मुलगी हिला आरोपींनी बळजबरीने गाडीवर बसवून पळवून नेले.

» पान १ वरुन

## आ. आवताडे यांनी अधिकाऱ्यावर...

प्रचारावेळी आमदार समाधान आवताडे यांनी जनतेची कामे करण्यासाठी आपण सदैव तत्पर राहू असे आश्वासन मतदारांना दिले होते. गेल्या 25 वर्षात म्हणावा तसा विकास झाला नाही मात्र तीन वर्षात आपण चांगला विकास केला असल्याने मतदार आपल्या कामावर खुश असून पुन्हा विजयी करतील असे सांगितले होते. यामुळे नागरिकांनी आमदार अवताडे यांच्या कामावर विश्वास ठेवून त्यांना विजयी केले आहे. यामुळे आता आमदार समाधान आवताडे यांची जबाबदारी वाढली असून त्यांनी नागरिकांची कामे वेळेत व्हावीत यासाठी शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर करडी नजर ठेवावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

## विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा मुख्य...

चांदीने मढविण्याचा निर्णय नांदेड येथील भाविक शंकर व नरसिंग मल्लू अरगुलवार यांनी घेतला. दरवाजा चांदीचा करण्यासाठी 30 किलो चांदी वापरण्यात येणार असून यासाठी 30 लाख रुपये खर्च येणार आहे. हा दरवाजा चांदीचा करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे स्वर्गवासी वडील दिगंबर व आई स्वर्गवासी जनाबाई यांच्या स्मरणार्थ अरगुलवार बंधू यांनी चांदीचा दरवाजा विठ्ठल मंदिरास बसविण्याचा निर्णय घेतला आहे.यामुळे विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे सौंदर्य आणखी खुलणार आहे.

## विठ्ठल रुक्मिणी च्या नित्य पूजा एका...

झाल्या आहेत. विठ्ठलाच्या नित्य पूजेसाठी २५ हजार तर रुक्मिणी मातेच्या नित्य पूजा साठी ११ हजार रुपये देणगी शुल्क आकारण्यात येत आहे. तसेच तुळशी अर्चन व पाद्य पूजेसाठी वेगवेगळी रक्कम आकारण्यात येत आहे. एका दिवसात विठ्ठल रुक्मिणीच्या सर्व पूजा हाउसफुल झाल्या असून भाविकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला असल्याचे दिसून येत आहे. पंढरपुरात दररोज भाविकांची संख्या वाढत आहे. यामुळे भाविकांना सोयी सुविधा देण्यासाठी शासनाने तीर्थक्षेत्र वाराणसी व उज्जैनच्या धर्तीवर पंढरपुरात कॉरिडॉर करण्याचा निर्णय घेतला आहे. याची अंमलबजावणी लवकरच सुरू करण्यात येणार आहे. यामुळे पंढरीत येणाऱ्या भाविकांना चांगल्या सोयी सुविधा मिळणार असून भाविकांची संख्या वाढून पंढरपुरात आर्थिक उलाढाल वाढणार आहे.

## मनमोहन सिंग यांचे मूर्ती देऊन केले होते स्वागत



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : तत्कालीन पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग यांनी सोलापूरला भेट दिलेली आठवण काँग्रेसचे माजी आमदार विश्वनाथ चाकोते यांनी सांगितली आहे. यावेळी चाकोते यांनी मनमोहन सिंग यांना अमृतसर मंदिर परिसरासारख्या असणाऱ्या तलावामध्ये आमचे ग्रामदैवत शिवयोगी सिद्धरामेश्वराचे मंदिर आहे असे सांगून त्यांना चांदीची मूर्ती भेट दिल्याची आठवण सांगितली. यावेळी माजी आमदार विश्वनाथ चाकोते यांच्यासह तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख व सुशीलकुमार शिंदे हे उपस्थित होते.

## दान...

पंढरी संचार छायाचित्र सेवा





**पंढरपूर** : श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेच्या चरणी आज (शुक्रवार) दिनांक 27 डिसेंबर रोजी नाव जाहीर न करण्याच्या अटीवर दानशूर भाविकाने सुर्य कळ्यांचा सोन्याचा हार गोफांसह अर्पण केला आहे. त्याचे वजन 132 ग्रॅम असून, अंदाजे किंमत 9 लाख 26 हजार होत असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

» Selected

## आ. देशमुख यांनी जाणून घेतल्या नंदूरकरांच्या समस्या



**सोलापूर** : सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पार्टीचे आमदार सुभाष देशमुख यांनी आपल्या जनसंवाद दौऱ्यांतर्गत नंदूर गावास भेट दिली. यावेळी त्यांनी नंदूरमधील ग्रामस्थांसोबत संवाद साधून त्यांच्या अडचणी, समस्या आणि मागण्या जाणून घेतल्या. यावेळी आ. देशमुख यांनी विधानसभा निवडणुकीत गावकऱ्यांनी दिलेल्या साथीबद्दल आभार व्यक्त केले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पंढरीत भाजपच्यावतीने माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती साजरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर** : माजी पंतप्रधान आणि हळव्या कवी मनाचे राष्ट्रीय नेते,अटल बिहारी वाजपेयी यांची शंभरावी जयंती बुधवार दि २५रोजी पंढरपूर भारतीय जनता पार्टी प्रदेश त्याचबरोबर जिल्हा कार्यकारणी शहर कार्यकारणी युवा मोर्चा यांच्या वतीने साजरी करण्यात आली .



पंढरपूर मंगळवेढ्याचे आ. समाधान दादा अवताडे यांच्या कार्यालयामध्ये अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन माजी शहराध्यक्ष काशिनाथ थिटे, प्रदेश सदस्य बाबाराव बडवे, यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी
श्याम तापडिया ,शहर सरचिटणीस, भारतीय जनता पार्टी, भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष डॉ प्राजक्ता बेणारे, भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा पंढरपूर शहराध्यक्ष डॉक्टर ज्योती शेटे , शहर उपाध्यक्ष सुवर्णा कुरणावळ, जिल्हाचिटणीस अंजना जाधव,शहर संघटन सरचिटणीस प्रतिभा गानमोटे , जिल्हा सरचिटणीस सरिता मुडे , स्वीय सचिव नवनाथ शिंदे ,शंकर सुरवसे,शेखर भोसले,विकास टाकणे, संतोष डोंगरे ,शरद चव्हाण व सर्व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.
माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी हे पंढरपूर येथे आले होते, यावेळी त्यांनी भाषण केले होते, त्याकाळच्या विविध आठवणींना माजी पदाधिकारी, सदस्य यांनी उजाळा दिला, डॉ प्राजक्ता बेणारे यांनी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी देशासाठी केलेल्या महत्वाच्या कार्याची माहिती देऊन महती पटवून दिली.

## पंढरपूर येथे पं.विकास कशाळकर फाऊंडेशन पंढरपूर वतीने २ दिवसीय संगीत महोत्सवाचे आयोजन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर** : पं.विकास कशाळकर फाऊंडेशन पंढरपूर यांचे वतीने शनिवार रविवार दिनांक २८-२९ डिसेंबर आरती प्रांगण भक्ती मार्ग येथे सायंकाळी ६:०० वा.दोन दिवसीय संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याचे अध्यक्ष डॉ.प्रसाद कुलकर्णी सचिव ज्ञानेश्वर दुधाणे यांनी सांगितले.

गेल्या १३ वर्षांपासून अभिजात शास्त्रीय संगीताचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी आणि नवोदित आणि ख्यातनाम गायक गायिका यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी या फाऊंडेशनची स्थापना होत असताना या आधीही स्वरयज्ञा बरोबर ख्यातनाम गायक गायिका यांचे गायन आणि कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या असतानाच कोरोनानंतर प्रथमच आंतरराष्ट्रीय किर्तीच्या ख्यातनाम गायक गायिका आणि वादकांच्या उपस्थितीत संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे .

शनिवार दिनांक २८ डिसेंबर रोजी सायंकाळी ५:३० वाजता ख्यातनाम बासरीवादक पं.राजेंद्र कुलकर्णी यांचे बासरी वादन तबला साथ ऋषिकेश सुरवसे आणि पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे करणार असून दुसऱ्या सत्रात आंतरराष्ट्रीय किर्तीचे ख्यातनाम गायक संजय गरूड पुणे यांचे शास्त्रीय गायन होणार असून त्यांना तबला रोहन पंढरपूरकर आणि हार्मोनियम तुषार केळकर पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे करणार असून दुसऱ्या दिवशी रविवारी पहिल्या सत्रात आंतरराष्ट्रीय किर्तीचे गायक पं.मुकुल कुलकर्णी यांचे गायन त्यांना तबला ऋषिकेश सुरवसे हार्मोनियम श्रीरंग जाकी करणार आहेत तर दुसऱ्या सत्रात ख्यातनाम गायिका गौरी पाठारे यांचे गायन त्यांना तबला पुष्कराज जोशी तर हार्मोनियम सुप्रिया जोशी करणार आहेत यांच्या गायनाने या महोत्सवाची सांगता होणार असून दोन्ही दिवसांचे कार्यक्रम विनामूल्य असून पंढरपूर व पंढरपूर पंचक्रोशीतील कलासाधक आणि रसिकांना विनंती आहे की आपण बहुसंख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी डॉ प्रसाद कुलकर्णी ज्ञानेश्वर दुधाणे माधूरीताई जोशी.उदय उत्पात.एस पी कुलकर्णी.आण्णासाहेब सुरवसे. राजेश खिस्ते.स्वानंदी काणे.धनंजय मनमाडकर.प्रज्ञा कुलकर्णी.तसेच विशेष सहकार्य सिध्देय पुरवत आणि तुकाराम कोळी यांचे मिळत आहे. संगीत प्रेमी अधिक परिश्रम घेत आहेत.

## जाहीर प्रसिद्धीकरण

दि. कि. अर्ज नं.३८७/२०२४

पंढरपूर येथील मा. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात...

सीता हरिबा सातपुते - अर्जदार

विरुद्ध

मा. ग्रामसेवक साहेब - सामनेवाला

ग्रामपंचायत तावशी, ता.पंढरपूर

तमाम लोकांना विशेषतः मौजे तावशी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथील व परिसरातील लोकांना कळविणेत येते की,

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात त्यांचा जन्म दि. ०१/०१/१९८१ रोजी अर्जदाराचे आईचे माहेरील मौजे तावशी, ता.पंढरपूर येथील राहते घरी झालेला असलेबाबत सामनेवाला यांचेकडून जन्म-मृत्यु रजिष्टरला नोंद होऊन त्यांचेकडून जन्माचा दाखला मिळावा म्हणून सामनेवाला यांना आदेश होणेकामी अर्ज केला आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, वरील जन्माची नोंद धरणेकामी व दाखला देणेकामी कोणाची काही लेखी अगर तोंडी तक्रार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत अथवा पुढील नेमली ता.--------- रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात स्वतः अगर विधीज्ञामार्फत हजर राहून हरकत / तक्रार नोंदवावी अन्यथा या वरील अर्जदार यांना सदरची नोंद धरुन दाखला देणेचा आदेश केला जाईल. त्यानंतर कोणाची कांही तक्रार चालणार नाही.

हे जाहीर प्रसिद्धीकरण आज ता.१६/१२/२०२४ रोजी सही निशी व शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का) सही/-

तहसिलदार,पंढरपूर




## लोटस इंग्लिश मिडीयम स्कूलचे

# वार्षिक स्नेहसंमेलन "अविष्कार" उत्साहाने संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ** : येथील लोटस इंग्लिश मिडीयम स्कूल या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन "अविष्कार" उत्साहाने संपन्न झाले.

गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यात नर्सरी ते सहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी मराठी साहित्याची ओळख, आपल्या देशाचे रक्षण करणारे सैनिक, थोर क्रांतिकारक ,मोबाईलचे दुष्परिणाम, खेळाचे महत्व, लेझीम, भारतातील वेगवेगळ्या राज्यातील गाणी तसेच महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांची रणनीती अशा विविध विषयांवर आधारित गाणी आणि नाटिकांचे उत्तम सादरीकरण केले . तसेच बालकलाकारांनी मनोरंजक गाण्यांचे नृत्यासह अत्यंत उत्साहाने सादरीकरण केले .




कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन मोहोळ च्या सह दिवाणी न्यायाधीश सौ. पी एस गोवेकर मोहोळ चे तहसीलदार श्री. सचिन मुळीक व सौ. मुळीक यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मोहोळचे बी.डी.ओ विशाल जमदाडे मोहोळचे पोलिस उपनिरीक्षक किरण कुमार पाटील यांनी ही दीप प्रज्वलन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या विद्यार्थिनी शिवांजली देशमुख, श्रीशा आदलिंगे आणि श्रुती देशपांडे यांनी केले. त्यांना मार्गदर्शन शाळेच्या शिक्षिका सौ. नम्रता कुलकर्णी व सौ. स्मीता गुमते यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रा.नंदकिशोर देशपांडे, उपाध्यक्ष व्यंकटेश तथा दीपक देशपांडे, सचिव अँड. अमोल देशपांडे, सह सचिव - ॲड अमित कुलकर्णी, संचालक - दिलीप वाघमोडे, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. केतकी देशपांडे तसेच शाळेच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम केले . या कार्यक्रमासाठी शहरातील पालक,हितचिंतक आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बुद्धीवादी अर्थतज्ज्ञाची एक्झिट

भारताचे माजी पंतप्रधान, माजी अर्थमंत्री, रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर यांसह अनेक पदे भूषवणारे आणि ती भूषवताना आपल्या विद्वत्तेच्या आधारे देशाच्या आर्थिक विकासाला चालना देणारे डॉ. मनमोहनसिंग यांनी नुकताच जगाचा निरोप घेतला. मनमोहन सिंग हाडाचे राजकारणी नव्हते. ते मूलतः अर्थतज्ज्ञ होते. त्यांच्या अर्थशास्त्राच्या प्रकांड अभ्यासामुळेच नरसिंह राव यांनी त्यांना त्यांच्या मंत्रीमंडळात अर्थमंत्रीपद देऊ केले. ते त्यांनी स्वीकारले आणि भारतीय अर्थकारणात इतिहास घडला. जागतिकीकरण आणि खुली अर्थव्यवस्था यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला मोठी गती दिली. आर्थिक सुधारणांमुळे देशाच्या आर्थिक व्यवस्थेत क्रांतीच घडून आली. नरसिंह राव यांची कारकिर्द संपल्यावर काँग्रेसही पार रसातळाला गेला होता. या कालखंडात मनमोहन सिंग सक्रीय राजकारणात कुठेही गुंतलेले दिसले नाहीत. काँग्रेसला सावरायला सोनिया गांधी सरसावल्या तेव्हाही त्यांच्याभोवती जमा झालेल्या हुजऱ्यांमध्ये मनमोहन सिंग नव्हते. इतकेच नव्हे तर काँग्रेसच्या किंवा देशाच्या एकूणच राजकारणाच्या गदारोळात ते कधी अडकले नाहीत. सोनिया गांधींना पंतप्रधान होण्यास पक्षाचा नसला तरी भारतातील काही जणांचा तीव्र विरोध होता. हा विरोध इतका तीव्र होता की अखेरीस सोनिया गांधींना पंतप्रधानपदावरील आपला दावा मागे घ्यावा लागला. त्यावेळी एक स्वच्छ प्रतिमेचा नेता म्हणून मनमोहन सिंग यांच्याकडे पंतप्रधानपदाची जबाबदारी सोपवण्यात आली. मनमोहन सिंग एक बुद्धीवादी नेता म्हणून त्यावेळी प्रसिद्धीस आले. जनाधार नसलेला हा नेता किती काळ नेतृत्व करू शकेल, अशी शंका त्यावेळी सगळ्यांनाच होती. पण त्यांनी पाच वर्षे आघाडी सरकारची मोट व्यवस्थित सांभाळली. इतकेच नव्हे तर २००९ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला जवळजवळ बहुमत मिळाले त्यात सिंग यांनी सरकारचे केलेल्या कुशल नेतृत्वाचेही मोठे योगदान होते. मनमोहन सिंग यांनी आर्थिक सुधारणा घडवून आणल्या, त्याही वेळी त्यांनी कसलाही गाजावाजा केला नव्हता. पण त्याचे चांगले परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर दिसू लागले होते. पुढील दोन-चार दशकांत भारताने आर्थिक प्रगतीच्या दिशेने झेप घेतली. आज भारत विकसित होण्याचे जे स्वप्न पहात आहे, त्याचा आधार असणाऱ्यांमध्ये डॉ. मनमोहन सिंग यांचे योगदान कदापि विसरता येणार नाही. ज्याला सवंग लोकप्रियता म्हणतात, अशी धोरणे आखण्याच्या मोहापासून मनमोहन सिंग यांनी आपल्या सरकारला दूर ठेवण्यात यश मिळवले. काँग्रेसमध्ये सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांचा शब्द शेवटचा मानला जातो, ज्यावेळी राहुल गांधी पंतप्रधानपदावर दावा सांगतील त्यावेळी आपल्याला या पदावरून दूर व्हावे लागेल याची जाणीव मनमोहन सिंग यांना नक्कीच होती. पण म्हणून ते केवळ गांधी परिवाराच्या छायेखालचे पंतप्रधान राहिले नाहीत. आंतरराष्ट्रीय स्तरावर डॉ. मनमोहन सिंग यांची लोकप्रियता मोठी होती. फक्त याबाबत त्यांनी कधी जाहीररित्या पाठ थोपटून घेतली नाही. हे स्थान त्यांनी आपल्या हिमतीवर आणि आपल्या हुशारीनेच निर्माण केले होते. आर्थिक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी दिलेले योगदान खूपच मोठे आहे. म्हणूनच तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी त्यांच्याबद्दल म्हटले होते, ते बोलतात, आम्ही ऐकतो. अमेरिकेतील 'टाईम' या मासिकाने तयार केलेल्या जगातील शंभर प्रभावशाली नेत्यांच्या यादीत मनमोहन सिंग होते. तर न्यूयॉर्क टाईम्सने तयार केलेल्या इतर नेत्यांना आवडणाऱ्या दहा नेत्यांत त्यांचा क्रमांक बराच वरचा होता. १९७०च्या दशकात डॉ. मनमोहन सिंग दिल्ली विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम करत होते. त्यानंतर त्यांनी काही काळ परदेशी व्यापार मंत्रालयातही परदेशी व्यापारमंत्री ललित नारायण मिश्रा यांच्या बरोबर काम केले. अर्थमंत्रालयातही ते काही काळ होते. ललित नारायण मिश्रा यांनी सिंग यांच्यातील चमक ओळखली होती. १९८२मध्ये मनमोहन सिंग यांची रिजर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली.१९८५पर्यंत ते या पदावर होते. त्यानंतर १९८५ ते १९८७ या कालावधीत ते नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष होते. १९९१मध्ये त्यावेळचे पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. त्यावेळी भारत मोठ्या आर्थिक अडचणीत होता. राव आणि सिंग यांनी आर्थिक उदारतेचे धोरण अवलंबले आणि समाजवादी अर्थव्यवस्थेचे रूपांतर भांडवलदारी अर्थव्यवस्थेत केले. त्यांनी अवलंबिलेल्या आर्थिक सुधारणांमुळे लायसन्स राज संपुष्टात आले. त्यामुळे खासगी उद्योगधंद्यांना चालना मिळाली. अनेक अडथळे दूर झाल्यामुळे थेट परकीय गुंतवणुकीलाही प्रोत्साहन मिळाले. १९९६ मध्ये झालेल्या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला आणि राव यांची सत्ताही संपुष्टात आली. १९९३ मध्ये १.८ अब्ज डॉलरच्या रोखे घोटाळाप्रकरणी आधीच खबरदारी न घेतल्याबद्दल संसदीय चौकशी समितीच्या अहवालात अर्थमंत्रालयावर ठपका ठेवला. तेव्हा अर्थमंत्री असलेल्या मनमोहन सिंग यांनी राजीनामा दिला. पण पंतप्रधान नरसिंह राव यांनी तो स्वीकारला नाही आणि या प्रकरणातील दोषींना कठोर शासन करण्याचे आश्वासन दिले.१९९१मध्ये सिंग पहिल्यांदा राज्यसभेत निवडून आले. त्यानंतर २००१ आणि २००७मध्ये ते पुन्हा राज्यसभेवर निवडून गेले. १९९८ ते २००४ या काळात भारतीय जनता पक्ष सत्तेवर असताना ते राज्यसभेत विरोधी पक्ष नेते होते. १९९९मध्ये त्यांनी दक्षिण दिल्लीतून लोकसभा निवडणूक लढवली, पण त्यात ते पराभूत झाले. २००४ मध्ये झालेल्या निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संपुआ आघाडीने भाजपच्या नेतृत्वाखालील रालोआ आघाडीचा पराभव केला. सोनिया गांधींनी मनमोहन सिंग यांची पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून घोषणा केली. लोकसभेची निवडणूक जिंकण्याची क्षमता नसलेल्या सिंग यांना यावेळी लोकांचा भरभरून पाठिंबा मिळाला. एक स्वच्छ आणि कसलाही कलंक नसलेला नेता म्हणून सिंग यांचा पंतप्रधान म्हणून भारतीय जनतेने स्वीकार केला. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना सर्वोत्तम जागतिक मुत्सद्दी म्हणून सन्मानित केले गेले. बाह्य व्यक्तिमत्त्वावरून एखाद्याविषयी मत बनवायची माणसांना खोड असते. डॉ. सिंग यांचे व्यक्तिमत्त्व बाह्यतः जरी प्रभावहीन भासत असले, तरी आपल्या कारकिर्दीत त्यांनी राष्ट्रगाडा ज्या धडाडीने आणि समर्थपणे चालविला, त्याला दाद द्यावीच लागेल. त्याचबरोबर कसोटीच्या क्षणी देशहितार्थ स्वतः रणांगणात उतरून आघाडी लढवण्याची त्यांची सवयही वेळोवेळी प्रत्ययास आली आहे. देशाच्या अर्थमंत्रिपदाची धुरा सर्वप्रथम स्वीकारली, तेव्हाची देशाची ढासळलेली आर्थिक परिस्थिती आणि २००८ मध्ये जागतिक आर्थिक मंदीलाही समर्थपणे तोंड देऊ शकलेली अर्थव्यवस्थेची बळकट स्थिती यामधील महद्अंतर पार करण्यात डॉ. सिंग यांचे मोठे योगदान इतिहास विसरू शकणार नाही. त्यांना भावपूर्ण आदरांजली.

**डॉ. मनमोहनसिंग यांच्या निधनामुळे देशाने एक संयमी, कुशल आणि अभ्यासू अर्थतज्ज्ञ गमावला असून, भारताच्या उदारीकरणाचे जनक म्हणून त्यांची राजकारण आणि अर्थकारणात ख्याती राहील. देशाच्या विकासात, अडचणींमध्ये मोलाची भूमिका बजावणारा हा अर्थतज्ज्ञ इतिहासात अमर झाला आहे. त्यांचे विचार, मनोगते आणि आर्थिक विषयावरील सल्ले देश कधीच विसरणार नाही.**

# आदरांजली एक 'अर्थपर्व' लयाला



**शंतनु चिंचाळकर**

**१९९० च्या** दशकामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेची धुरा खंबीरपणे सांभाळणाऱ्या मनमोहन सिंग यांचे निधन झाल्याने देशाने एक महान अर्थतज्ज्ञ, द्रष्टा सुधारणावादी आणि जागतिक धुरंधर नेता गमावला. डॉ. मनमोहन सिंह विनयशीलता, सहनशीलता, सहिष्णुता आणि करुणेचे प्रतीक होते. भारताची आर्थिक सुधारणा घडवून आणणारे हे महान व्यक्तिमत्त्व येणाऱ्या पिढ्यांसाठी अक्षय्य प्रेरणास्त्रोत राहील. प्रकृतीच्या कारणास्तव डॉ. मनमोहन सिंह हे गेल्या काही वर्षांपासून राजकारणापासून दूर होते. १९९१ मध्ये देश आर्थिक संकटाशी सामना करत असताना त्यावेळचे अर्थमंत्री मनमोहन सिंह यांनी देशाची बाजारपेठ जगासाठी खुली केली. त्यांनी खासगीकरण-उदारीकरण आणि जागतिकीकरणाचा मार्ग अवलंबला आणि देशाची अर्थव्यवस्थाही रुळावर आणली.

मनमोहन सिंह यांचा जन्म २६ सप्टेंबर १९३२ रोजी पाकिस्तानमधील गाह या गावी झाला. १९४७ मध्ये फाळणीदरम्यान विस्थापित होऊन सिंह कुटुंब भारतात आले. त्यानंतर त्यांनी पंजाब विद्यापीठातून पदवीपर्यंत शिक्षण घेतले. डॉ. मनमोहन सिंह यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठातून अर्थशास्त्रात डॉक्टरेट घेतली. ते ३३ वर्षे खासदार होते. विद्वान, मृदू, मितभाषी आणि संवेदनशील नेता म्हणून मनमोहन सिंग यांच्याकडे पाहिले जायचे. जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्यानंतर ते पहिलेच असे पंतप्रधान होते, जे दहा वर्षे देशाचा राज्यकारभार सांभाळू शकले. २००४ ते २०१४ असे दहा वर्ष ते देशाचे पंतप्रधान होते. तसेच १९९८ ते २००४ या काळात ते राज्यसभेचे विरोधी पक्षनेतेही होते.

तीन वर्षांपूर्वी म्हणजे १९९१ मध्ये डॉ. मनमोहन सिंग यांनी राज्यसभेच्या माध्यमातून आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. चार महिन्यातच त्यांनी माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय अर्थमंत्री म्हणून शपथ घेतली. १९६६ ते १९६९ या काळात मनमोहन सिंह यांनी संयुक्त राष्ट्रात काम केले. नंतरच्या काळात ते भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयात सल्लागार म्हणून रुजू झाले. १९७२ ते १९७६ या काळात भारत सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार म्हणून त्यांनी काम केले. १९८२ ते १९८५ या काळात त्यांनी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून काम केले. त्यानंतर १९८५ ते १९८७ या काळात त्यांनी नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष म्हणून काम केले. १९९१ च्या आर्थिक संकटकाळी तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव यांच्याकडून मनमोहन सिंग यांची अर्थमंत्रीपदी निवड करण्यात आली. अर्थमंत्री म्हणून मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात अर्थव्यवस्थेचे उदारीकरण करण्यात आले. भारताला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यात त्यांनी मोठी भूमिका पार पाडली. १९९६ मध्ये मनमोहन सिंह हे राज्यसभेचे विरोधी पक्षनेते होते. २००४ मध्ये यूपीएची सत्ता आल्यानंतर त्यांनी देशाचे तेरावे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली.

पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली अर्थमंत्री डॉ मनमोहन सिंग यांच्या हस्ते नवीन आर्थिक धोरणाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. अर्थव्यवस्थेवरील निर्बंध कमी करण्यासाठी आणि जागतिक आर्थिक परिदृश्यात भारताचे स्थान मजबूत करण्यासाठी धोरण तयार करण्यात आले. त्याद्वारे आर्थिक सुधारणांच्या दिशेने एक मोठे पाऊल म्हणून भारत सरकारने १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण सादर केले.

जागतिक क्षेत्रात भारताची आर्थिक विश्वासार्हता वाढवण्यासाठी त्यांनी पावले उचलली. १९९१ च्या भारताच्या नवीन आर्थिक धोरणाने परकीय चलनाचा साठा तयार करणे, बाजारातील निर्बंध दूर करणे आणि जगभरातील वस्तू, सेवा, भांडवल, मानव संसाधन आणि तंत्रज्ञानाची देवाणघेवाण वाढवणे यावर लक्ष केंद्रित केले. यामुळे अर्थव्यवस्थेच्या वाढीला चालना मिळाली.

भारत सरकारने सप्टेंबर २००५ मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५ मंजूर केला. हा कायदा ग्रामीण कुटुंबातील प्रौढ सदस्यांना आर्थिक वर्षात शंभर दिवसांच्या मजुरीच्या रोजगाराची कायदेशीर हमी देतो. या कायद्याद्वारे रोजगाराची मागणी करणाऱ्या आणि अकुशल हाताने काम करण्यास इच्छुक असलेल्या ग्रामीण भागातील कुटुंबांना आर्थिक वर्षात शंभर दिवसांच्या रोजगाराची हमी दिली जाते. या योजनेत प्रस्तावित केलेल्या रोजगारांपैकी एक तृतीयांश रोजगार महिलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद होती.

मनमोहन यांच्या सरकारची महत्वाची उपलब्धी म्हणून २००८ च्या भारत-यूएस नागरी आण्विक कराराकडे पाहता येते. या कराराने ऊर्जा सुरक्षा आणि राजनैतिक संबंधांसाठी भारतीय इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा गाठला. 'सिव्हील न्युक्लिअर डील' या अमेरिकेबरोबर केलेल्या करारामुळे भारताला अनेक दशकांपासून मर्यादित असलेल्या अणुऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अमेरिकेकडून सहकार्य मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला. भारत-अमेरिका अणुकरारानंतर, ऑस्ट्रेलिया समूह, वासेनार करार, क्षेपणास्त्र तंत्रज्ञान नियंत्रण व्यवस्था यासारख्या इतर निर्यात नियंत्रण गटांमध्ये भारताच्या सदस्यत्वाचा मार्ग मोकळा झाला. भारत-अमेरिका अणुकरारानंतर, भारताला धोरणात्मक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण तंत्रज्ञानात प्रवेश मिळू शकला. अनिच्छुक राजकारणी म्हणून संबोधल्या गेलेल्या डॉ. मनमोहन सिंग यांच्या पंतप्रधानपदाच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात याच सर्वात महत्वाच्या अणुकरारावरील महत्त्वपूर्ण विश्वासदर्शक ठरावावर समाजवादी पक्षाचा पाठिंबा मिळवला गेला होता. ही लक्षवेधी मुत्सद्देगिरी मानली गेली.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा-२०१३ हा भारत सरकारने अधिसूचित केलेला कायदा आहे. याद्वारे देशातील सर्वसामान्य जनतेला अन्नधान्य उपलब्ध असावे हे सुनिश्चित करण्याचे भारत सरकारचे उद्दिष्ट आहे. मनमोहन सिंग सरकारची ती एक महत्वाची उपलब्धी मानवी लागेल. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा, २०१३ (याला अन्नाचा अधिकार कायदा म्हणूनही ओळखले जाते)चा उद्देश भारतातील १.२ अब्ज लोकांपैकी सुमारे दोन तृतीयांश लोकांना अनुदानित अन्नधान्य प्रदान करणे हा आहे.

एप्रिल २०२४ मध्ये त्यांनी प्रकृतीच्या कारणास्तव राज्यसभेतून निवृत्ती घेतली. राज्यसभेतील त्यांच्या शेवटच्या दिवशी कौतुकाचा वर्षाव करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना 'प्रेरणादायी उदाहरण' म्हटले होते. 'मनमोहन सिंग यांनी देशाला दीर्घकाळ उत्तम प्रकारे मार्गदर्शन केले. जेव्हा जेव्हा आपल्या लोकशाहीचा उल्लेख केला जाईल तेव्हा ते त्या मोजक्या सन्माननीय सदस्यांपैकी एक असतील. ज्यांचे योगदान नेहमीच स्मरणात राहील,' असे मोदी म्हणाले होते. डॉ. मनमोहन सिंग यांच्या स्मरणार्थ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सर्व अधिकृत कार्यक्रम, स्थापना दिन समारंभ पुढील सात दिवसांसाठी रद्द करण्यात आले. यात सर्व आंदोलनात्मक आणि इतर कार्यक्रमांचा समावेश आहे.

'माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे अशा दुर्मीळ राजकारण्यांपैकी एक होते, ज्यांनी सर्वांना समानतेने हाताळले. भारतीय अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. केलेल्या देशसेवेसाठी, निष्कलंक राजकीय जीवनासाठी आणि अत्यंत नम्रतेसाठी ते देशवासीयांच्या नेहमीच स्मरणात राहतील.' असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटले. याखेरीजही अनेक महनियांनी त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले. राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांचे अफाट अर्थकौशल्य गौरवले गेले. माजी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी तर त्यांना गुरु मानले होते. देशाच्या विकासात, अडचणींमध्ये मोलाची भूमिका बजावणारा हा अर्थतज्ज्ञ इतिहासात अमर झाला आहे. त्यांचे विचार, मनोगते आणि आर्थिक विषयावरील सल्ले देश कधीच विसरणार नाही.




**पंचांग**

**शनिवार, दिनांक २८ डिसेंबर २०२४.** मार्गशीर्ष कृ. १३, अनुराधा, श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, उत्तरायण, हेमंत ऋतू. शनिप्रदोष.
**नक्षत्र :** अनुराधा, योग : शूल, करण : गरज.
**सूर्योदय** : स.०६.५१ सूर्यास्त : सायं.०५.३९ वा.
**राहू काळ : सकाळी : ९:०० ते १०:३०**

**दिनविशेष**

▶१८२८ : जपानमध्ये ६.८ रिक्टर तीव्रतेचा भुकंप आला. यात ३०,००० लोक मृत्युमुखी पडले. ▶१८८५ : राष्ट्रीय सभेचे (काँग्रेसचे) पहिले अधिवेशन मुंबईत भरले. ▶१८९५ : जगातील पहिले चित्रपटगृह पॅरिस येथे सुरू झाले. ▶१९०० : प्रसिद्ध लेखक संपादक ग. त्र्यं. माडखोलकर यांचा जन्मदिन. ▶१९२६ : हुतात्मा शिरीषकुमार यांचा जन्मदिन. ▶१९४८ : मुंबईत राज्यात 'कसेल त्याची जमीन' या सूत्रावरील कूळ संरक्षक कायदा अस्तित्वात आला. ▶१९७७ : ज्येष्ठ हिंदी साहित्यिक सुमित्रानंदन पंत यांचा स्मृतिदिन. ▶१९९५ : 'आयआरएस-१सी' या भारताच्या तिसऱ्या दूर संवेदन उपग्रहाचे काझाकिस्तानातील बअकानूर अंतराळ तळावरून अवकाशात यशस्वी प्रक्षेपण. ▶१९९५ : प्रसिद्ध चित्रकार आबालाल रेहमान यांचा स्मृतिदिन. ▶ १९९९ : ज्येष्ठ कलावंत चंद्रकांत मांडरे आणि भाभा अणुशक्ती केंद्राचे संचालक डॉ. अनिल काकोडकर यांना शिवाजी विद्यापीठातर्फे डी. लिट पदवी जाहीर.

**राशीभविष्य**

▲ **मेष :** मनाप्रमाणे खर्च कराल. ▲ **वृषभ :** खिसा पाकिटं सांभाळा. ▲ **मिथुन :** पैशाची तजवीज होईल. ▲ **कर्क :** नवीन व्यक्तीशी मैत्री होईल. ▲ **सिंह :** मनपसंत व्यक्तीचा सहवास. ▲ **कन्या :** कमी श्रमात जास्त यश. ▲ **तुळ :** अपेक्षित बातमी समजेल. ▲ **वृश्चिक :** आप्तेष्ट भेटतील. ▲ **धनु :** ठरलेली कामे लांबतील. ▲ **मकर :** कामाच कंटाळा येईल. ▲ **कुंभ :** नवीन अनुभव घ्याल. ▲ **मीन :** प्रिय व्यक्तींचा सहवास लाभेल.

**चिंतन**

एखादे कार्य आपण न्यायबुद्धीने करीत आहोत यावर आपला विश्वास असतो, तेव्हा त्यात अपयश आले तरीही आपला संघर्ष चालूच ठेवावा. कारण त्यावेळेस आपण यशाची पहिली पायरी चढत असतो.

– **अब्राहम लिंकन**

**व्यक्तीविशेष**

## हुतात्मा शिरीषकुमार

साक्षात मृत्युवरही विजय मिळवून अमर झालेला हुतात्मा म्हणजे शिरीषकुमार. शिरीषकुमार यांचा जन्म २८ डिसेंबर १९२६ रोजी झाला. महात्माजींच्या चले जाव आंदोलनाचे वारे देशभर पसरले. जनआंदोलनाचा सागर उसळला. भारतात ठायी-ठायी व्यक्ती पेटली, बेचाळीस क्रांतिलागी दिव्य शक्ती भेटली, असा तो काळ. गावोगाव तिरंग ध्वंज हाती घेऊन, ब्रिटिश सोजिरांची पर्वा न करता प्रभातफेऱ्या निघत होत्या. बलिदानाची आण घेऊन स्वातंत्र्याच्या ध्येयासाठी लक्षावधी जनता त्यात सहभागी होत होती. मोठ्यांचं अनुकरण छोटेही करत होते. आईवरी विपत्ती आम्ही मुले कशाला, असं म्हणत क्रांतिपर्वात सामील होत होते. अशीच एक मिरवणूक निघाली. ९ सप्टेंबर १९४२ रोजी नंदूरबार येथे. तिच्या अग्रभागी होते हाती तिरंगा घेतलेले शशिधर नीलकंठ केतकर, लालदास शहा, घनश्याम शहा, धनसुखलाल वाणी आणि शिरीषकुमार, वंदे मातरमचा जयघोष करणाऱ्या त्या युवकांना ब्रिटिश पोलिसांनी बंदुकीचा धाक दाखविला. पण त्याची फिकीर या युवकांनी केली नाही. अखेर गोळी सुटली तिने अवघ्या सोळा वर्षाच्या शिरीषकुमारच्या छातीचा वेध घेतला. आज हुतात्मा शिरीषकुमारचा जन्मदिन.

**बोधकथा**

## चांगले मित्र जवळ हवेत

जंगलात एकटे पडलेल्या कावळा आणि कासवाने तळ्याकाठी राहणाऱ्या कासवासोबत राहण्याचे ठरवले. कासवाने प्रेमाने त्यांचे स्वागत केले. कावळ्याने झाडावर घरटे बांधले तर त्याच झाडाच्या बुंध्याशी उंदराने घर तयार केले. तिघे आनंदाने राहत होते. एक दिवस एक हरिण धावत आले. त्याला बघून या तिघांनी त्याला विचारले, 'तू का धावतोस ? शिकारी पाठलाग करत आहे का?' त्यावर हरिण 'हो' म्हणाले आणि मदत करण्याची विनंती केली. हे ऐकताच उंदीर बिळत सटकला, कासव पाण्यात शिरले आणि कावळ्याने हरणाला एका झुडपाआड लपण्यास सांगितले. शिकारी आल्यानंतर त्याला हरिण काही सापडले नाही. तेव्हापासून हरिणही त्यांचा मित्र झाला. इथे शिकारी येतात म्हटल्यानंतर कासव घाबरू लागले कारण त्याला इतरांसारखे जोरात पळता येत नव्हते. म्हणून त्याने ठिकाण बदलण्याचे ठरवले आणि तो चालू लागला. त्याच्या मागोमाग तयाचे तिघे मित्रही निघाले. अर्ध्या रस्त्यात शिकाऱ्याने कासवाला गाठले. **(पूर्वार्ध)**

**जिज्ञासा**

## सॅकरीनचा शोध

ती चव लागताच त्याच्या मनात विचार आला की नुकत्याच बनवलेल्या पदार्थाचे काही सूक्ष्म कण ओठांना चिकटले असणार आणि त्याची चव गोड असणार. त्याने पुन्हा बोटाने जीभेला स्पर्श केला तेव्हा त्याची चव परत गोडच लागली. मग त्याच पदार्थाचा एक स्फटीक त्याने तोंडात टाकला. तोही गोड लागला. पुढे या संयुगाचा त्याने रेमसन यांच्या मार्गदर्शनाखाली सखोल अभ्यास केला आणि सॅकरीन नावाचा साखरेपेक्षा ५५० पटींनी अधिक गोड असणारा पदार्थ अस्तित्वात आला. सॅकरॉस या ग्रीक शब्दावरून त्याला सॅकरीन हे नाव देण्यात आले. तसे पाहिले तर सॅकरीनला कोणतेही आहार मूल्य नाही. पण पुढे साखरेऐवजी पदार्थाला गोडी येण्यासाठी याचा वापर होऊ लागला. नंतरच्या काळात सॅकरीनपासून होणारी हानी लक्षात आल्यामुळे काही ठिकाणी त्यावर बंदी घालण्यात येऊ लागली. **(उत्तरार्ध)**

**सामान्यज्ञान**

## कॅरेबियन समुद्र

कॅरेबियन समुद्र हा अटलांटिक महासागर आणि मेक्सिकोच्या आखाताच्या मधील समुद्र आहे. या समुद्राच्या दक्षिणेस वेनत्झुएला आणि कोलंबिया, नैऋत्येस पनामा, पश्चिमेस कोस्टा रिका, निकाराग्वा, ग्वाटेमाला आणि बेलिझ, उत्तरेस ग्रेटर अँटिल्स, क्युबा, जमैका, डॉमिनिकन प्रजासत्ताक आणि पोर्तो रिको तर पूर्वेस लेसर अँटिल्स हे देश आहेत. या समुद्राचे क्षेत्रफळ सुमारे २७ लाख १९ हजार चौरस किलोमीटर इतके आहे. कॅरेबियनमध्ये पसरलेल्या एका रुंद, जलमग्न पठार प्रदेशामुळे कॅरॅबियनचे पूर्व आणि पश्चिम असे भाग पडले आहेत. पठारप्रदेशाच्या उंच भागावर मस्कीटो, रोझॅलिंड, पेट्रो बॅंक, जमेका आदी बेटे वसलेली आहेत. पश्चिम भाग लहान असून केमॅन समुद्र म्हणूनही तो ओळखला जातो. कॅरॅबियन समुद्राची खोली सुमारे २५६० मीटर इतकी असली तरी त्यातील बऱ्याच ठिकाणी ४५०० मीटरहून अधिक खोली आढळते.

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ५४३**


| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 2 | 4 | 1 |
| | 1 | | 2 |
| | 4 | | 3 |
| 2 | | 1 | |

**क्रमांक ५४२ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 2 | 4 | 1 |
| 1 | 4 | 2 | 3 |
| 4 | 3 | 1 | 2 |
| 2 | 1 | 3 | 4 |

**हास्यविनोद**

संता आणि बंता त्याच्या मित्रांबरोबर बारमध्ये दारू पित असतात. इतक्यात पाऊस येतो.
संता म्हणतो, मी छत्री घेऊन येतो. तोपर्यंत कुणीही दारू पिऊ नका. संता जातो तास दोन तास होतात तरी तो परत येत नाही.
कंटाळून बंता आणि मित्र म्हणतात, चला तो येत नाही. आपण आता सकळीच दारू पिऊया. इतक्यात कोपऱ्यात लपलेला संता म्हणतो, मला माहित आहे. म्हणून मी गेलोच नाही.



**महिलायन**

## आरोग्य मुलांच्या दातांचं

पाच-सहा वर्षांपर्यंतच्या मुलांच्या दातांना त्यांच्या आई-वडिलांनी ब्रश करुन दिला तर ते जास्त योग्य ठरेल. काहीवेळा मुलं स्वतःच ब्रश करण्याचा हट्ट धरतात. अशावेळी त्यांना ब्रश करु द्यावा. पण रात्रीच्या वेळी मात्र आपणच ब्रश करुन द्यावा. मुलांसाठी बाजारात खास टूथपेस्ट उपलब्ध असतात. मुलांसाठी फ्लोराईडयुक्त टूथपेस्ट वापरु नये. ब्रशवर एखाद्या मटारच्या दाण्याएवढी टूथपेस्ट लावावी. त्याचवेळी मुलं पेस्ट खाऊन टाकणार नाहीत, याकडेही लक्ष द्यावं. कधी त्याने टूथपेस्ट खाल्ली आहे, असं लक्षात आल्यास दोन-तीन वेळा त्याला उलट्या करायला लावाव्यात. त्यानंतर त्याला दूध प्यायला द्यावं. त्यामुळे फ्लोराईडयुक्त टूथपेस्टचा प्रभाव कमी होईल. मुलांना सुरुवातीला दात येतील त्यावेळी डॉक्टरकडून त्यांची तपासणी करुन घ्यावी. एक किंवा दीड वर्षाच्या अंतराने मुलांना दंतरोगतज्ज्ञाकडे घेऊन जावं. त्यामुळे सुरुवातीला काही समस्या असतील तर त्यावर वेळीच उपचार होऊ शकतील. मुलं ज्यावेळी सात-आठ वर्षांची होतील त्यावेळी त्यांना पुन्हा डॉक्टरांकडे घेऊन जावं. त्यावेळी काही आर्थोडेंटिक समस्या असतील तर या वयात त्यावर उपचार करणं सोपं जाईल. त्याचे उपचार अतिशय सोपे असतात. मुलांना कधीही माऊथवॉशचा उपयोग करु देऊ नये. कारण मुलं ते पिऊ शकतात आणि त्याचे भविष्यात गंभीर परिणाम होतात. मुलांना कमी साखर असणारे खाद्यपदार्थ खायला द्यावेत. ज्यामध्ये फायबर असेल असे खाद्यपदार्थ त्यांना अधिक खायला द्यावेत. त्यांनी काही गोड पदार्थ खाल्ले असतील तर त्यानंतर त्यांनी तोंड व्यवस्थित साफ केलं आहे की नाही, याकडे लक्ष द्यावं. मुलांना औषध दिल्यानंतरही त्यांचं तोंड स्वच्छ करावं. मुलांच्या दातांवर फ्लोराईड ॲप्लिकेशनचाही उपयोग करता येईल. पण मुल ३ वर्षांपेक्षा लहान असेल तर त्याचा उपयोग करु नये. मुलांच्या दातांमध्ये काही खड्डे असतील तर त्यामध्ये खाल्लेले पदार्थ वारंवार अडकतात. अशावेळी दंतरोगतज्ज्ञांकडून ती जागा सील करुन घ्यावी. त्यामुळे तेथे खाणं अडकून कुजणार नाही आणि कीडही निर्माण होणार नाही. अशा प्रकारे मुलांच्या दातांची योग्यवेळीच काळजी घेतली तर भविष्यात निर्माण होणाऱ्या समस्यांपासून बचाव होऊ शकेल. **(उत्तरार्ध)**

**गंमतग्यान**

## चुंबकीय क्षेत्राबद्दल जाणणारा शार्क

त्यानंतर वैज्ञानिक आता शार्क मासा पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राबाबत किती संवेदनशील आहे हे शोधत होते. त्यासाठी शास्त्रज्ञांनी एक स्कॅलेंड हॅमरडेड शार्क आणि सहा सॅंडवार शार्क यांचा वापर केला. या महाकाय प्राण्याला प्रयोगादरम्यान सात मीटर परीघाच्या टॅंकमध्ये ठेवले गेले. या टॅंकशी सलग्न भूतळावर तांब्याच्या तारांचे जाळे विणून चुंबकीय क्षेत्र तयार केले गेले होते. ज्या वेळेला चुंबकीय क्षेत्र सक्रीय होत होते त्या वेळी मासे भोजन नसतानाही फिडींग झोनकडे जात होते. यावरून हे सिद्ध झाले की त्यांच्या शरीरात दिशा सुचक कंपास आहे. मजेची गोष्ट म्हणजे कृत्रिम चुंबकीय क्षेत्र सक्रिय होताच हे मासे ताबडतोब प्रतिक्रिया व्यक्त करत होते आणि वेगाने पोहोयला सुरवात करत होते. **(क्रमशः)**

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

## कऱ्हास्नान पालखी सोहळ्याची तयारी, भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता

# सोमवती यात्रेसाठी जेजुरीकर सज्ज



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेणारा भारतीय लोकदैवत आणि राज्याचे कुलदैवत असलेल्या जेजुरी येथील श्रीखंडोबा देवाचा सोमवारी होत असलेल्या सोमवती अमावस्या पालखी प्रस्थान आणि कऱ्हास्नान सोहळा आयोजन करिता जेजुरीकर मानकरी, गावकरी, खांदेकरी, गुरव, कोळी, वीर, कोळी, घडशी ग्रामस्थांसह देवसंस्थान कमिटी या आयोजन मेळाव्यास ऐतिहासिक अशा अहिल्यादेवी होळकर यांच्या गौतमेश्वर छत्री मंदिरा येथे उपस्थित होते.

बहुजन समाजाचा लोकदेव असणाऱ्या जेजुरीच्या श्रीखंडोबा देवाची सोमवती यात्रा सोमवारी भरणार असून, सोमवारी दुपारी १ वाजता श्री खंडोबा देवाचा पालखी सोहळा जेजुरी गडावरून कऱ्हा स्नानासाठी मार्गस्थ होणार आहे.

कुलदैवत खंडोबा देवाच्या वर्षाकाठी आठ यात्रा भरतात. सोमवारी येणाऱ्या अमावस्येला सोमवती यात्रा भरते. या यात्रेला विशेष धार्मिक महत्व आहे. सोमवारी जेजुरीत यात्रा भरणार असल्याने, या यात्रेच्या नियोजनासाठी जेजुरीच्या ऐतिहासिक छत्री मंदिरात श्री खंडोबा पालखी सोहळा समिती मानकरी, खांदेकरी, समस्त ग्रामस्थ मंडळाच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी १ वाजता श्री खंडोबा देवाच्या पालखी सोहळ्याचे जेजुरी गडावरून प्रस्थान होईल. पालखी सोहळा कऱ्हा नदीला पोहचल्यानंतर उत्सव मूर्तींना कऱ्हा स्नानाचा धार्मिक विधी होईल, अशी माहिती देवाचे मानकरी इनामदार पेशवे यांनी सांगितले.

श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने पालखी सोहळ्यातील देवाचे मानकरी पालखी सोहळ्याचे खांदेकरी, भाविक यांच्यासाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, धालेवाडी रेल्वे गेटवर पाच हजार भाविकांना अल्पोपहार व चहा पाण्याची व्यवस्था, पालखी सोहळा गडावर पोहोचल्यावर खांडेकरी मानकरी यांच्यासाठी महाप्रसाद व्यवस्था करण्यात आली असल्याचे देवसंस्थानचे प्रमुख अभिजित देवकाते यांनी सांगितले.

श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने ग्रामदेवता जानाई देवी मंदिराच्या बांधकामाची जवाबदारी घेतली आहे. ३० जानेवारी अखेर मंदिराचे काम पूर्ण करावे, गोकर्ण महाबळेश्वर येथे ग्रामदैवता जानाई देवीच्या मूर्तीचे काम सुरू आहे. कलशाचे कामही लवकरच सुरू करण्यात येणार आहे. या कामासाठी ग्रामस्थांनी आर्थिक सहकार्य करावे, असे आवाहन जानाई देवी ट्रस्टचे प्रमुख सुधीर गोडसे यांनी केले.

पुढील वर्षी सोमवती यात्रेची पर्वणी नसल्याने सोमवारी होणाऱ्या यात्रेसाठी मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. तसेच कऱ्हा नदीवर उत्सव मूर्तींना स्नान घालताना मानकरी वर्गाने शिस्तबध्दपणे सोहळा साजरा करावा, या ठिकाणी जागा कमी असल्याने सुरक्षिततेच्या बाबतीत काळजी घ्यावी, यात्रेत भेसळयुक्त भंडारा विक्री करणाऱ्यांवर कारवाई करावी, असे आवाहन श्री खंडोबा पालखी सोहळा ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे यांनी केले.

सोमवती यात्रा नियोजनाच्या या बैठकीला ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, इनामदार सचिन पेशवे, राजेन्द्र पेशवे पदाधिकारी सुधीर गोडसे, कृष्णा कुदळे, छबण कुदळे, गणेश आगलावे, रोहिदास माळवदकर, संतोष खोमणे, अरुण खोमणे, रामदास राऊत, शैलेश राऊत, राजाभाऊ चौधरी, अनिल झगडे, पंडित हरपळे, पुरोहित शशिकांत सेवेकरी, योगेश खाडे, गिरीष झगडे, पुजारी सेवक वर्ग, देवाचे मानकरी सोहळ्याचे खांदेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जेजुरी देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त, जेजुरी देवसंस्थानचे विश्वस्त प्रमुख अभिजित देवकाते, मंगेश घोणे, पोपट खोमणे, व्यवस्थापक आशिष बाठे, बाळासाहेब खोमणे, गणेश डीखळे, महेश नानेकर हेही या वेळी उपस्थित होते.

# आठवडे बाजार दिवशी मनमानी व्यापार

## वाहतूक कोंडीचा जुन्नरकरांना त्रास

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** जुन्नर शहरातील परदेशपुरा या नेहमी वर्दळ असलेल्या रस्त्यावर रविवारच्या आठवडे बाजाराचा दिवशी मोठ्या प्रमाणात भाजीपाला, फळे विक्री करणारे व्यापारी, शेतकरी हे या रस्त्यावर मनमानी पध्दतीने व्यापार करीत असल्याने वाहतूक कोंडी चा त्रास सर्वांनाच सहन करावा लागत आहे. याबाबत जुन्नर नगर परिषद व जुन्नर पोलिसांकडून योग्य कार्यवाही न झाल्यास ५ जानेवारी रोजी राजपूत समाज सेवा संस्था जुन्नर च्या वतीने आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

या संस्थेचे अध्यक्ष विक्रम परदेशी, उपाध्यक्ष सुमित परदेशी, सचिव राहुल परदेशी, यश राजपूत, मनोज परदेशी, वैभव परदेशी, सत्यजित राजपूत, आदित्य परदेशी, अभिषेक परदेशी, निलेश खोत, रोहित खोत, ओंकार परदेशी आदींनी समाज बांधवांच्या वतीने याबाबतचे निवेदन मुख्याधिकारी पोलीस निरीक्षक जुन्नर यांना सादर केले.

परदेशपुरा चौकात एसटी बस थांबा असून, शहरात येण्याकरिता हा मुख्य रस्ता आहे. तसेच किल्ले शिवनेरी, लेण्याद्री गणपती, नाणेघाट, एसटी बस स्थानक, बाजार समिती, विविध शासकीय कार्यालये, बँका याकडे जाणारा हा मुख्य रस्ता असल्याने या रस्त्यावर नेहमी मोठी वर्दळ असते. परदेशपुरा रस्त्यावर दर रविवारी आठवडे बाजार भरतो. या बाजारात शेतकरी, व्यापारी रस्त्यावर बसून व्यापार करीत असतात. मात्र कोणतीही शिस्त न बाळगता मनमानी पध्दतीने ते रस्त्यावर बसून व्यापार करत असल्याने, रविवारी दिवसभर वाहतूक कोंडीचा त्रास सर्वांनाच सहन करावा लागतो. या कोंडीमुळे अनेकदा वादाचे प्रसंग घडतात. तसेच स्थानिक नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो.



# कबड्डीसाठी सूक्ष्म नियोजन करा

## वैभव नावडकर यांनी दिले निर्देश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेच्या अनुषंगाने प्रत्येक बाबींचे सूक्ष्म नियोजन करुन स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयांनी कामे करावीत, असे निर्देश उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर यांनी दिले. ही स्पर्धा १५ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत रेल्वे मैदान, बारामती येथे होणार आहे.



नावडकर यांच्या अध्यक्षतेखाली नवीन प्रशासकीय भवन येथे स्पर्धा उपसमिती सदस्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे खासगी सचिव नीलप्रसाद चव्हाण, तालुका क्रीडा अधिकारी महेश चावले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सेवक मुखेकर, सुभाष पाटील, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपअभियंता प्रदीप जगताप, वाहन निरीक्षक बजरंग कोरोवले, पुणे जिल्हा कबड्डी संघटनेचे सदस्य सतपाल गावडे, कबड्डी खेळाडू दादासाहेब आव्हाड आदी उपस्थित होते.

## » Selected

# राष्ट्रीय स्पर्धेत श्रावणी शितापला ब्रॉझ




**इंदापूर :** राष्ट्रीय सीनियर कुराश चॅम्पियनशिप लुधियाना पंजाब येथे २३ ते २५ डिसेंबर रोजी झाली. या स्पर्धेमध्ये भारतातून २५ राज्यांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये महाराष्ट्राला पुणे जिल्ह्याच्या श्रावणी प्रशांत शिताप हिने ब्रांझ मेडल मिळवून महाराष्ट्राचे नाव भारत देशामध्ये उंचवल्याबद्दल कुराश असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष अंकुश नागर व सचिव शिवाजी साळुंखे आंतरराष्ट्रीय पंच दत्तात्रय व्यवहारे यांनी अभिनंदन केले, तसेच शहा हेल्थ क्लबचे प्रमुख भरत शेठ शहा व मुकुंद शेठ शहा यांनी देखील श्रावणीला शुभेच्छा देऊन तिचे कौतुक केले. क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनीही श्रावणीला शुभेच्छा दिल्या.

# शेतकऱ्याची आत्महत्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** तालुक्यात कर्जबाजारीपणाला कंटाळून एका अल्पभूधारक शेतकऱ्याने आपले जीवन संपवले आहे. प्रकाश (पप्पु) सस्ते (वय ३३) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव असून, त्यांनी चिक्कुच्या बागेत असलेल्या एका झाडाला दोरीच्या साह्याने गळफास घेत आत्महत्या केली आहे. ही घटना बुधवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली आहे. सस्ते यांनी शेतीसाठी आणि पशुपालनासाठी एका पतसंस्थेकडून कर्ज घेतले होते. सस्ते यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याने त्यांच्या घरावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

या घटनेबाबत मयताचे वडील दत्तात्रय महादू सस्ते यांनी ओतूर पोलिसांत खबर दिल्यानुसार पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरिक्षक एल. जी. थाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहे. त्यांचे नातेवाईक व भाऊ निखील सस्ते यांनी संयुक्तपणे दिलेल्या माहितीनुसार, प्रकाश सस्ते हे अल्पभूधारक शेतकरी होते. त्यांना एक एकर शेती होती. तसेच शेतीसोबतच जोडधंदा म्हणून त्यांनी पशुपालनाचा व्यवसाय करायचे. यासाठी त्यांनी जमिनीवर एका पतसंस्थेकडून कर्ज घेतले होते. तसेच हात उसने पैसे देखील घेतले होते. मात्र, त्यांच्यावरील कर्जाचा बोजा वाढतच चालला होता. आपल्या कुटुबांचे भविष्यात कसे होणार याची चिंता त्यांना सतावित असल्याने त्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले असल्याचे सांगण्यात येत आहे.

# यवत परिसरात अवैध धंद्यांना ऊत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** गेल्या काही दिवसांपासून यवत (ता. दौंड) व उरुळी कांचन (ता. हवेली) पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात मटका, जुगार, गांजा विक्री, गावठी दारु व देह विक्री व्यवसायासह सर्व प्रकारच्या अवैध धंद्यांना ऊत आला असून, पोलीस प्रशासन या अवैध धंद्यांवर कारवाईचा बडगा उगारीत नसल्याने हे अवैध धंदे सुसाट चालत आहेत. त्यामुळे यवत व उरुळी कांचन पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



पुणे ग्रामीण पोलीस दलातील सर्वात मोठे पोलीस ठाणे म्हणून यवत पोलीस ठाण्याची ओळख असून त्याची हद्दही मोठी आहे. सदर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बोरीऐंदी ते पाटस यादरम्यान असलेल्या पुणे-सोलापूर महामार्गाचा भाग येतो. या महामार्गालगत अनेक अवैध व्यवसाय सुरु आहेत. संबंधित अवैध धंदे चालकांच्या पाठीमागे काही राजकीय नेते व पोलीस खात्यातील काही वरिष्ठांचे आशीर्वाद आहेत. त्यामुळे हे धंदे राजरोसपणे सुरु असून गुन्हेगारांचे अड्डे बनले आहेत.

उरुळी कांचन पोलीस ठाण्याची परिस्थितीही काही वेगळी नाही. या पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोरतापवाडी, नायगाव व उरुळी कांचन शहरात तीन मोठे जुगाराचे अड्डे नव्याने सुरु झाले आहेत. तर शिंदवणे व पांढरस्थळ परिसरात मोठ्या प्रमाणात हातभट्टीची दारू तयार केली जाते. या दारूची मागणी पुणे शहरासह जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात असते. अनेक टपऱ्यांवर अवैध गुटखा व गांजाची विक्री केली जाते. तर चौकाचौकात व काही केशकर्तनाच्या दुकानात मटका खेळला जातो.

### पोलिसांकडे लक्ष

जिल्हा ग्रामीण पोलीस दलाची तगडी यंत्रणा असतानाही अवैध धंदे बिनधास्त सुरु आहेत. या अवैध धंद्यावर पोलीस कारवाई करण्यास टाळाटाळ करीत असल्याची चर्चा दबक्या आवाजात नागरिकांमध्ये सुरु आहे. तसेच हे सगळे अवैध धंदे खुलेआम सुरु आहेत, मग यवत व उरुळी कांचन पोलीस नेमके करतात तरी काय? असा संतप्त सवाल नागरिकांनी केला आहे. स्वच्छ प्रतिमा म्हणून ओळख असलेले जिल्हा (ग्रामीण) पोलीस अधीक्षक पंकज देशमुख हे यावर ठोस उपाययोजना म्हणून काय कारवाई करणार? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# जिजामाता संकुलात विज्ञान प्रदर्शन उत्साहात



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** पुणे जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग तसेच पंचायत समिती पुरंदर शिक्षण विभाग व जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज व जिजामाता इंग्लिश मिडीयम स्कूल जेजुरी यांच्या वतीने ५२ वे तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शन २६ व २७ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आले आहे.

प्रदर्शनाचे उद्‌घाटन श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड या संस्थेचे सचिव माजी शिक्षणाधिकारी दत्तात्रय गवळी,मार्तंड देव संस्थानचे प्रमुख विश्वस्त अभिजीत देवकाते विश्वस्त मंगेश घोणे यांनी केले. मान्यवरांचे स्वागत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर तसेच जिजामाता मिडीयम स्कूलच्या मुख्याध्यापिका सरिता कपूर यांनी केले. यावेळी राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त मुख्याध्यापक कुंडलिक मेमाणे, सेकंडरी बँक मुंबईचे उपाध्यक्ष सुधाकर जगदाळे, न्यूइंग्लिश स्कूल जवळार्जूनचे प्राचार्य उत्तमराव निगडे, हरणी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक मधुकरराव जगताप, माहूर माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमंत पवार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी विद्यालयाचे प्राचार्य युवराज घोळवे, महर्षी वाल्मीक विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक चव्हाण, जिजामाता प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गायत्री बेलसरे आदी यावेळी उपस्थित होते. परीक्षक म्हणून विलास वंजारी, संतोष आवारी, प्रभावती काळे, अलका पाटेकर हे जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत काम पाहणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलोफर इनामदार व स्नेहल भोसले यांनी केले, तर आभार नंदिनी गांजुरे यांनी मानले.

# जेजुरी पोलिसांची धडक कारवाई

## गॅस सिलिंडरचा काळाबाजार करणारी टोळी गजाआड

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** घरगुती गॅस सिलिंडरमधून मशिनच्या साहाय्याने गॅस काढून अवैधपणे व्यापारी सिलिंडर भरणाऱ्या चार जणांच्या जेजुरी पोलिसांनी मुसक्या आवळल्या. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे गॅसचा काळाबाजार करणाऱ्या मोठ्या टोळक्याच्या पर्दाफाश झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार जेजुरी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मौजे कर्नलवाडी गुळूंचे हद्दीत सत्यवान जगन्नाथ निगडे यांच्या बंद पडक्या प्लोट्री शेडमध्ये काही व्यक्ती विना परवाना घरगुती गॅसच्या टाक्या



मधून व्यापारी टाक्यांमध्ये गॅस भरत असल्याचा प्रकार सुरू असल्याची माहिती पोलिसांपर्यंत पोहोचली. त्या माहितीच्या आधारे जेजुरी पोलीस आणि पुरंदर तालुका पुरवठा विभागाने संयुक्तरित्या छापा टाकून कारवाई करत गॅस सिलिंडरचा मोठा साठा जप्त केला. यामध्ये १,८६,००० रू किमतीच्या एकूण भरलेल्या ६२ टाक्या, ३६,८०० रू किमतीच्या ८ कमर्शियल टाक्या, ८१,००० रू किमतीच्या मोकळ्या ५४ टाक्या, ७५,००० रू किमतीच्या घरगुती गॅसच्या मोकळ्या टाक्या असा एकूण १२,६४,६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी अभिजीत दत्तात्रय बरकडे (२२, मोराळवाडी बारामती), विश्वजीत बारीकराव यमगर (२२, पिराळे ता. माळशिरस), तुकाराम चंद्रकांत खताळ ( ३०, कापसी, ता. फलटण), सत्यवान जगन्नाथ निगडे (५०, कर्नलवाडी, पुरंदर) यांनी पांडुरंग राजेंद्र गोफणे (मोराळवाडी, बारामती) यांच्या सांगण्यावरून हे काम करत असल्याचे सांगितले.

# आज शरीर सौष्ठव स्पर्धा

**जुन्नर :** राज्यस्तरीय शरीर सौष्ठव शिवनेरी श्री २०२४ जुन्नर या स्पर्धेचे आयोजन शनिवारी सायंकाळी जुन्नरमध्ये करण्यात आलेले आहे, अशी माहिती शिवनेरी फिटनेसचे महेश शेटे, जितेश शेटे यांनी दिली.

महाराष्ट्र शिवनेरी श्री विजेत्यास ५१ हजार रुपये रोख, मेडल, ट्रॅफिक देऊन सन्मानित करण्यात येणार असून, ५५ किलो ते ८५ किलो वजनी गटातील पहिल्या पाच विजेत्यांना रोख रक्कम व ट्रॅफिक देऊन गौरव करण्यात येणार आहे. या स्पर्धांकरिता सेलिब्रिटी ट्रेनर सुनील मगदुम, शितल वाडेकर, महाराष्ट्र श्री २०२३ हे उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्र राज्यस्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धा या पहिल्यांदाच जुन्नरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या आहेत. शनिवारी सायंकाळी शिवनेरी गडाच्या पायथ्याशी होणाऱ्या या स्पर्धा पाहण्याकरिता, सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आलेले आहे.



# कांदा पीक संकटात

## शेतकऱ्यांकडून कांद्यावर औषध फवारणी सुरू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** सततच्या ढगाळ हवामान, दाट धुक्यामुळे कांदा पीक संकटात सापडले आहे. आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी खबरदारीचा उपाय म्हणून कांदा पिकावर औषध फवारणी सुरू केली आहे. अगोदरच कांदा रोपे, मजूर टंचाई त्यात त्यात आता महागड्या औषध फवारणीमुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ झाल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणित सापडले आहेत.

रब्बी हंगामात तालुक्याच्या पूर्व भागात पारगाव, शिंगवे, काठापूर,रांजणी, नागापूर, वळती, गांजवेवाडी, भागडी आदी परिसरात कांदा पीक मोठ्या प्रमाणावर



रांजणी येथे दुषीत हवामानामुळे खबरदारी म्हणून कांदा पिकावर औषध फवारणी करताना शेतकरी. (छाया: रोहीत खुडे).

शेतकऱ्यांनी घेतले आहे. यंदा कांद्यांना बाजारभाव देखील चांगले मिळाले आहेत. त्यामुळे लागवड क्षेत्रात देखील मोठी वाढ झाली आहे. यंदा कांदा लागवडीसाठी रोपांचा तुटवडा निर्माण झाला. परतीच्या पावसाचा फटका कांदा रोपांना बसला होता. त्यानंतर कांदा लागवडीसाठी मजूर मिळत नव्हते. शेतकऱ्यांनी जादा मजुरी देऊन कांदा लागवडींची कामे पूर्ण करून घेतली. आता कांदा पीक एक महिन्याचे झाले आहे. त्यामुळे कीडीरोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी कांदा पिकावर महागड्या औषधांची फवारणी सुरू केली.

## भूमिअभिलेख विभागाची माहिती

# ५ गावांमध्ये स्वामित्व योजनेअंतर्गत सनद वाटप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** पुरंदर तालुक्यातील गावठाणांमधील जमिनींचे ड्रोन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने जीआयएस आधारित सर्वेक्षण व नकाशा तयार करून मिळकतपत्रिका (प्रॉपर्टी कार्ड) स्वरूपात अधिकार अभिलेख तयार करण्याची महत्त्वाकांक्षी व लोकाभिमुख योजना सध्या ग्रामविकास विभाग, भूमिअभिलेख आणि सर्व्हे ऑफ इंडिया यांच्या संयुक्त सहभागाने राबविण्यात आली होती. गावठाणातील सनद वाटपाचा कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. याबाबतची माहिती भुमिअभिलेख विभागाच्या उपाधीक्षिका स्मिता गौड यांनी दिली.

पुरंदर तालुक्यातील जवळार्जुन, खोपडेवाडी, राजेवाडी, रिसे, पिसे या गावातील लाभार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गावठाण सनद वाटप करण्यात येणार आहेत. गावाची वाढती लोकसंख्या विकासाच्या निरनिराळ्या योजना, यामुळे गावात भौगोलिक बदल होत असून, जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया वेगाने सुरू आहे; मात्र ग्रामीण भागात गावठाणाचे अभिलेख नसल्यामुळे नेमकी जागा किती आहे? याबाबत सुस्पष्टता नसते.




गावठाण कार्यक्षेत्रातील बांधकाम परवाने देण्याचे अधिकार योग्य पध्दतीने हाताळण्याकरिता गावठाण भूमापन होऊन प्रत्येक मिळकतीचा नकाशा असणे आवश्यक आहे, तसेच मालमत्तेचे मालकीपत्र (प्रॉपर्टी कार्ड) नसल्यामुळे आर्थिक पतही निर्माण होत नाही. ग्रामस्थांची अशी होणारी गैरसोय टाळणे गरजेचे असल्याने ग्रामविकास विभागाने दि. २२ फेब्रुवारी २०१९ रोजी गावठाणामधील जमिनींचे जीआयएस आधारित सर्वेक्षण व भूमापन करण्याबाबत योजना राबविण्यास मान्यता दिलेली आहे. या योजनेच्या कार्यवाहीसाठी महसूल व वन विभागाने दि. ८ मार्च २०१९ रोजीच्या अधिसूचनेनुसार गावांतील जागेचे भूमापन करण्याचे निर्देश दिले आहेत. पुरंदर तालुक्यातील एकूण १०१ ग्रामपंचायत असून वाड्यावर मिळुन ११० गावांपैकी यापूर्वी नगर भूमापन झालेली गावे वगळून उर्वरित ४७ ग्रामपंचायतींचे गावठाणाचे दोन द्वारे सर्वेक्षण करण्यात आले होते. यामध्ये ८ हजार मिळकतींच्या सनदा तयार करण्यात आल्या असून ३२ लक्ष पन्नास हजार रुपये सनदी वसूल झाली आहे.

### सनद पुरावा प्राप्त करून घ्या

● जवळार्जुन, खोपडेवाडी, राजेवाडी, रिसे, पिसे या गावातील लाभार्थ्यांनी सनद वाटपाच्या ठिकाणी उपस्थित राहून सनद पुरावा प्राप्त करून घ्यावा जेणेकरून भविष्यात सदर मिळकतीवर होणाऱ्या लाभांचा फायदा आपणास घेता येईल, असे आव्हान भुमिअभिलेखच्या उपअधीक्षका स्मिता गौड यांनी केले आहे. या मालकीपत्रामुळे (प्रॉपर्टी कार्ड) ग्रामस्थांची आर्थिक पतही उंचावून त्याचे एकूण राहाणीमानात व व्यवसायात भरीव प्रगती होत असल्याचे आपल्याला दिसून येत आहे.

पंढरी संचार
युथ झोन
शनिवार, २८ डिसेंबर २०२४

१. प्लासीची लढाई कोणत्या साली झाली? २. पुरू राजा आणि अलेक्झांडर यांच्यातील लढाई कोणत्या नद्यांच्या मध्ये झाली? ३. श्रीरंगपट्टणमचा करार कुणात झाला? ४. तोडरमल कशासाठी प्रसिद्ध होता? ५. कोणत्या मुघल बादशहांनी त्यांची आत्मचरित्रे लिहिली आहेत?

## वाढवा जीके

**उत्तरे : १. १७५७, २. झेलम आणि चिनाब, ३. टीपू सुलतान आणि कॉर्नवॉलीस, ४. जमीन महसूल सुधारणा, ५. बाबर आणि जहांगीर**

## मोलाचे विचार

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते.
– डॉ. बाबासाहेब आंबेडकर



## टेक्नोलॉजी

# तरुणाईसाठी काही उपयोगी सोशलसाईटस्

जगभरात काम करणाऱ्या पाच अशा वेबसाईटस आपण पाहूया. ज्या तरुणाई आणि इंटरनेट ची सांगड ही सामाजिक कामासाठी घालू शकतो, हे सिद्ध करतात.

**टेकिंग आयटी ग्लोबल :** ही सोशल वेबसाईट जगभरातल्या तरुणांचे प्रश्न सोडवण्याचे काम करते. ह्या वेबसाईटचे सभासद झाल्यावर विद्यार्थी त्यांच्या कल्पना मांडू शकतात, किंवा वेबसाईटच्या इतर सभासदांकडून सुचना मागवू शकतात. त्यानुसार ते काम करु शकतात.

**रॅन्डमकिड :** ही सोशल वेबसाईट तीन टप्प्यात काम करते. या वेबसाईटवर जाऊन तुम्ही एखादा प्रश्न निवडू शकता. उदा. स्वच्छ पाणी. या प्रश्नावर विविध संस्थांनी सुचविलेले उपाय तुम्ही पाहून निवडू शकता. नंतर या तुमच्या प्रकल्पाच्या पेजवर तुम्ही ते सांगून निधी गोळा करु शकता.




**कूडूझ :** ही संवादी वेबसाईट आहे. ज्या तरुणांना काही सामाजिक बदल घडवून आणायची इच्छा असते, अशांसाठी ही वेबसाईट उपयोगाची आहे. यात वेबसाईटच्या वापरकर्त्यांच्या वयानुसार आव्हानात्मक कामे दिलेली असतात. या वेबसाईटवरून माहिती घेणे, वापरणे याकरिता त्यांचे सभासदत्व घ्यावे लागते.

**डू समथिंग डॉट ऑर्ग :** ही वेबसाईट टीनएजर म्हणजे १३ वर्षांपुढील तरुण–तरुणींसाठी आहे. या वेबसाईटवर त्याच पद्धतीची माहिती देण्यात आली आहे. ही वेबसाईटवर शोध घेताना काही मुलांसाठीचे प्रकल्पही दिसतील. प्रश्नही दिसतील. कोणत्या कारणाने, कुणाबरोबर, कुठे आणि किती काळ या चार स्तरांवर आधारित प्रकल्प तुम्हाला पाहायला मिळतील.

**फ्री राईस :** जगातल्या आहार कार्यक्रमाला या वेबसाईटचा फायदा होतो आहे. ही सोशल वेबसाईट नाही, ती कोणत्याही प्रकारच्या मदतीचे आवाहन करत नाही. या वेबसाईटवर गेल्यावर, तुम्हाला काही प्रश्न विचारले जातात. त्यांच्या बरोबर उत्तरासाठी गरजवंत समाजाला तांदूळ दान करण्यात येतात. विद्यार्थी किंवा शिक्षणासंबंधी लोकांनी आकर्षित करण्याच प्रयत्न ही वेबसाईट करते. प्रत्येक योग्य उत्तरासाठी प्रायोजक तांदूळ दान करतो. अनेक शिक्षक शाळेमध्ये ह्या वेबसाईटचा शिकवण्यासाठी वापर करतात. समूहाने सुद्धा यात सहभागी होता येते.

# एमएस ऑफीसच्या वेळबचाऊ ट्रिक्स

**क्विक स्टाईल वापरा :** वर्डमध्ये असलेली सर्व कागदपत्रे क्विक स्टाईलचा वापर करून फॉरमॅट करू शकता. ही स्टाईल किंवा पद्धत वापरल्याने तुम्हाला फॉंट किंवा हेडिंगची स्टाईल बदलण्याची गरज भासत नाही. क्विक स्टाईल हे आपल्याला जुन्या फॉरमॅटमधील डॉक्यूमेंट सहजपणे मोठ्या फाईलमध्ये उपलब्ध करून देते.

**ऑफिस क्लिपबोर्ड :** ऑफिस क्लिपबोर्ड वापरून आपण अनेक बाबी अनेकदा कॉपी आणि पेस्ट करू शकतो. मायक्रोसॉफ्ट ऑफीस क्लिपबोर्डमुळे आपण चोवीस वेळेस




कॉपी–पेस्ट करू शकतो. त्याचबरोबर ऑफिस डॉक्यूमेंटस किंवा अन्य प्रोग्रॅममधून ग्राफिकल गोष्टी अन्य ऑफीस डॉक्यूमेंटसमध्ये पेस्ट करू शकतो.

**फॉरमॅटिंग मार्क्स :** फॉरमॅटिंग मार्क्स आपण शो किंवा हाइड करू शकतो. आपल्या डॉक्यूमेंटमधील टेक्स्ट लेआऊटसाठी फॉरमॅटिंग मार्क्स साह्यभूत ठरतो. आपल्याला एखाद्या लेखांचे विशेष लेआऊट करायचे असेल तर फॉरमॅटिंग मार्क्स उपयोगी ठरतो.

**किबोर्ड शॉर्टकट :** आपल्या गरजेनुसार किबोर्ड शॉर्टकट तयार करु शकतो. माक्रो, फॉंट, स्टाईल किंवा चिन्ह यासाठी शॉर्टकट उपलब्ध आहेत. त्याचबरोबर आपण तयार केलेले शॉटकर्ट काढून टाकू शकतो.

**क्विक पार्टस :** स्टोअर निर्मितीसाठी क्विक पार्टस गॅलरीचा वापर करू शकतो. आपल्याला हवा असलेला मजकूर तेथून घेऊ शकतो. त्यात ॲटो टेक्स्ट, डॉक्यूमेंट प्रॉपर्टीज यासारख्या डॉक्यूमेंटसह पुस्तकांचा समावेश असतो.

# कामातील एकाग्रता वाढवण्यासाठी...

**▶ नियमितपणा ठेवा :** कामातील एकाग्रता आणि एकसंधपणा राहण्यासाठी ऑफिसमधील आपल्या कार्यमग्नतेत नियमितपणा ठेवायला हवा. ऑफीसची वेळ नियमितपणे पाळून सर्व गोष्टी वेळच्या वेळी करण्याची सवय असावी. आज आपल्याला कोणते काम पूर्ण करायचे आहे, याबाबत सजग राहून ते काम वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. नियमितपणे येणाऱ्या मेलला तात्काळ प्रतिसाद देणे, त्याचबरोबर लंच टाइमध्ये आपण काय केले आणि काय करायला पाहिजे, याचा उजाळा घ्या, जेणेकरून राहिलेल्या गोष्टी पुन्हा करून आपल्या कामात सुधारणा करता येऊ शकेल.



**▶ एकावेळी एकच गोष्ट करा :** अनेकांना कामं अंगावर ओढून घ्यायची सवय असते. त्यातून एकही काम धड आणि चांगल्या पद्धतीने पार पाडले जात नाही. उलट वरिष्ठाची बोलणी खावी लागतात. एकावेळी एकच काम निवडून ते नियोजनबद्धरितीने कसे पूर्ण करता येईल, याचा विचार करावा. ते काम तडीस नेण्यासाठी पूरक गोष्टींचा विचार करावा आणि गरजेनुसार त्याची उपलब्धता करून ते काम पूर्ण होऊ शकते. कधी कधी एकावेळी अनेक आघाड्यावर काम करावे लागते. अशा वेळी तुमच्या कार्यक्षमतेचे कौशल्य पणाला लागते. एकाचवेळी मेल, फोन, समोरचा व्यक्ती, बॉसशी संवाद अशा अनेक गोष्टींना सांभाळावे लागते. परंतु आपण विचारपूर्वक या गोष्टी हाताळू शकतो, असा आत्मविश्वास निर्माण करणे गरजेचे आहे. या आत्मविश्वासाच्या बळावरच सर्व कामे आपण व्यवस्थित पार पाडू शकतो.

**▶ कामाचे नियोजन करा :** काम कोणतेही असो घरचे किंवा कार्यालयाचे ते करण्यापूर्वी त्याचे नियोजन करणे गरजेचे आहे. कामाचा प्राधान्यक्रम ठरवून त्यानुसार ते काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. तातडीचे, अतिमहत्त्वाचे, महत्त्वाचे, कमी महत्त्वाचे, साधारण अशी वर्गवारी करून त्यात कामाची यादी केली पाहिजे. कामाचा प्राधान्यक्रम निश्चित केल्याने कोणतेही काम रेंगाळत नाहीत आणि आपण प्रत्येक कामाला पुरेसा वेळ देऊन ते काम योग्यपद्धतीने हाताळू शकतो. कामाच्या नियोजनामुळे अवघड कामही सोपे होऊ शकते आणि येणारे संभाव्य दडपणही कमी होऊन कामावर एकाग्रता ठेवू शकतो.

**▶ अवघड काम अगोदर :** अवघड काम आहे, म्हणून ते लांबणीवर टाकून आपणच अडचणी निर्माण करतो. अशा वेळी जे अवघड काम आहे, ते अगोदर घेऊन ते पूर्ण करण्यासाठी अधिक प्रयत्न करायला हवेत. अवघड काम अगोदर पार पाडल्यामुळे पुढील कामावरची एकाग्रता कायम राहते. अवघड कामाचा विचार मनात येत नाही आणि आपण आपले लक्ष्य सहज गाठू शकतो. एकदा आपण अवघड कामगिरी पार पाडली की पुढची कामे आपोआप होत जातात.

**▶ कामाची वाटणी करा :** एका टप्प्यात एखादे काम पूर्ण होत नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याची वाटणी दोन–तीन टप्प्यात करा. कारण काही कामांना किंवा उपक्रमांना वेळ अधिक द्यावा लागतो. आपल्या अपेक्षेपेक्षा त्या कामाला अधिक वेळ लागला तर त्यावरची एकाग्रता ढळू न देता ते काम पूर्ण करण्यासाठी त्याची विभागणी करून ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा. तसेच कामामुळे आपल्या शिथिलता येण्याची शक्यता असते. आपल्या फ्रेश वाटावे म्हणून कामात ब्रेक घेण्याची सवय ठेवली पाहिजे. फावल्या वेळेत हलक्याफुलक्या विषयावर चर्चा करून काही वेळ विरंगुळा करावा. तसेच सुटीच्या दिवशी कुटुंबासमवेत, मित्रांसमवेत थोडा वेळ दिला की मनावरचे दडपण कमी होऊन दुसऱ्या दिवशी फ्रेश मुडमध्ये कामावर जाण्यास तयार राहतो. जेणेकरून आपल्या कामावरची एकाग्रता कमी होत नाही.

# चांगला रुममेट शोधताना...


*शिक्षणानिमित्त किंवा नोकरीनिमित्त आपल्याला गाव सोडावे लागते. शिक्षणाच्या ठिकाणी आपल्याला हॉस्टेल मिळेलच याची खात्री देता येत नाही. अशा वेळी आपण राहण्यासाठी एखादी रुम किंवा फ्लॅट पाहतो. त्या रुमचे किंवा फ्लॅटचे भाडे एकट्यानेच भरण्याऐवजी एखादा पार्टनर किंवा रुममेट पाहतो. बरेच जण आपल्याच क्लासमधील मुलाला रुममेट करतात, जेणेकरून अभ्यासासाठी उपयोगी ठरेल तर अनेक जण वैचारिक साम्य असलेल्या मित्राला प्राधान्य देतात. कधी कधी अनोळखी व्यक्तीला रुममेट म्हणून स्वीकारावे लागते. त्याच्या जर सवयी चांगल्या असतील तर ठिक, नाही तर वाद किंवा गैरसमज होण्यास वेळ लागत नाही. तो जर व्यसनी, भांडकुदळ असेल तर आपल्या अभ्यासावर, कारकिर्दीवर परिणाम होण्याची शक्यता असते. म्हणूनच चांगला रुममेट किंवा पार्टनर मिळणे खूप आवश्यक आहे. आपल्या करियरची पायाभरणी होत असताना उत्तम मित्र किंवा पार्टनर हा महत्त्वाची भूमिका बजावत असतो. रुममेट पाहताना आपण काही पथ्ये पाळली पाहिजेत, ती अशी.*

**काळजीपूर्वक निवड :** रुममेट किंवा सहकारी पाहताना तो



कसा आहे, राहणीमान, नीटनेटका, वेळ पाळणारा आहे की नाही याची पडताळणी करून घेणे गरजेचे आहे.अभ्यासाबाबत किंवा नोकरीबाबत त्याची संकल्पना काय आहे, हेही जाणून घेतले पाहिजे. नियमित साफसफाई करणे, कपड्यांचा पसारा न वाढविणे याकडे कटाक्ष ठेवणारा रुममेट चांगला सहकारी बनू शकतो. बेशिस्त, आळशी, उगाच गप्प्याडा, टाईमपास करणारा किंवा वेळखावू रुममेट आपल्यासाठी नुकसानकारक ठरू शकतो. रुममधील कामाचे वाटप करून दोघांनी त्याची जबाबदारी पेलावी लागते. ही जबाबदारी पेलण्यास तयार आहे का, हेही तपासण्याची गरज आहे. ओळखीचा किंवा मित्र असेल किंवा एकाच वर्गात असेल तर त्यात फारशा अडचणी येत नाहीत. मात्र अनोळखी व्यक्तीला जागा देताना या गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे.

**खर्चाचे नियोजन :** रुम किंवा फ्लॅटमध्ये राहताना खर्चाचे नियोजन करणे गरजेचे आहे. रुमचा किराया, मेसचा खर्च, मेटेनन्स, लाइटबिल, फोनबिल आदींबाबत गोष्टी स्पष्ट केल्या पाहिजेत. वेळेवर किराया देऊन मालकाला आपल्याबद्दलचा विश्वास वाढविण्याची गरज असते. तो विश्वास टिकवण्यासाठी येणारा



रुममेट योग्य आहे का नाही, हेही तपासून पाहयला हवे.

**सवयी पाहणे :** दोघे एकत्र राहण्यापूर्वी नव्या रुममेटच्या सवयी पाहणे महत्त्वाचे ठरते. जर दोघांच्या सवयी मिळत्या जुळत्या असतील तर चांगला पार्टनर होऊ शकतो. एक पार्टनर शाकाहरी असेल आणि दुसरा जर मासांहारी असेल तर एकत्र राहणे अवघड जाते. पार्टनरला पार्ट्या करण्याची, उगाचच मित्र गोळा करण्याची सवय असेल तर रुममधील मित्रांना अवघडल्यासारखे होते. तसेच वारंवार होणाऱ्या पार्ट्यांमुळे सोसायटीत नावही खराब होण्याचा धोका असतो. अशा वेळी संभाव्य पार्टनरची माहिती अन्य मित्रांकडून किंवा कॉलेजमधून गोळा करणे.


**मित्राचीच निवड करा :** रुममेट निवडताना शक्यतो मित्र असलेला अधिक चांगले. कारण मित्र असल्याने त्याचे आचार–विचारांची माहिती असते. त्यामुळे एकत्र राहताना संभाव्य अडचणी येत नाही. मित्र असल्याने आर्थिक अडचणीच्या काळात तो कोणताही विचार न करताना मदत करू शकतो. अनोळखी व्यक्तीकडून अशी अपेक्षा बाळगताना संकोचपणा येण्याची शक्यता अधिक असते.

**कुटुंबाची पार्श्वभूमी तपासा :** रुममेट म्हणून स्वीकारताना संबंधित मुलाची किंवा मुलीची कौटुंबिक पार्श्वभूमी पाहणे गरजेचे आहे. उच्च शिक्षित कुटुंबातील रुममेट हा आपले जीवन सुसह्य करू शकतो. याउलट गुन्हेगारी पार्श्वभूमीचा किंवा दादागिरी करणाऱ्या लोकात राहणारा रुममेट आपल्यासाठी डोकेदुखी ठरू शकतो. रुममेटचे चारित्र्य, वैचारिक पातळी पाहूनच त्याला आपल्या खोलीत प्रवेश द्यायला हवा. वाचन करणारा, चांगले विचार मांडणारा, भविष्याबाबतचा दृष्टीकोन सांगणारा प्रगल्भ विचाराचा मित्र किंवा रुममेट आपल्याला अडचणीच्या काळात मदतीला येऊ शकतो.

**खासगी आयुष्य जपणारा :** रुममध्ये राहत असताना दोघांनीही आपापले खासगी आयुष्य जपण्याची खबरदारी घेतली पाहिजे. उगाचच एकमेकाच्या आयुष्यात ढवळाढवळ किंवा दखल देण्याचा प्रयत्न करू नये. अशा विचाराचा रुममेट असणे योग्य ठरेल. एखादेवेळी फोनवरून कुटुंबातील अडचणीबाबत चर्चा होत असेल तर समोरील पार्टनरने त्याबाबत उगाचच चौकशी करून त्यात हस्तक्षेप करू नये. गरज भासल्यास संबंधित मित्राला सल्ला मागितल्यास आपले मत मांडणे योग्य ठरू शकते. परंतु इच्छा नसताना लुडबूड करणे योग्य नसते. रुमवर येणारे पाहुणे, मित्रमंडळी यांचा आदर कसा राखला जाईल, याची काळजी घेणारे रुममेट असावेत.

**फॅशनच्या अत्यंत वैविध्यपूर्ण अशा ट्रेन्ड्समध्ये सध्या आरामदायक आणि हटके लूक देणारा ट्रेन्ड म्हणजे पायजमा ट्रेन्ड होय. अर्थात हा ट्रेन्ड अगदीच नवा नाही. पण सध्या तो नवे रुप घेऊन आलेला आहे, एवढे मात्र नक्की. काही वर्षांपूर्वी फक्त झोपताना पायजमा घालण्याचा ट्रेन्ड होता. परंतु आता मात्र तरुणींमध्ये 'पायजमा लुक' हा एक महत्वाचा फॅशन ट्रेन्ड बनलेला आहे. कुठल्याही फॅशन स्ट्रीटवर गेल्यानंतर नव्या रुपातल्या पायजम्याची असंख्य रुपे पहायला मिळतात. स्टायलिश आणि पॉलिश्ड् लूक येण्यासाठी आपण हा पायजमा वेगवेगळ्या प्रकारे कॅरी करु शकतो.**

# पायजमा नव्या रुपात



**▶ ॲक्सेसरीसोबत पायजमा :** पायजम्यासोबत कॉटन शर्ट्स वेगळ्या स्टाईलिश पद्धतीने घालता येऊ शकतात. स्टाईलिश पायजम्यासोबत कुल सनग्लासेस, क्लासिक शुज, स्ट्रक्चर्ड बॅग, शिफॉन स्कार्फ, हॅट इत्यादी प्रकारच्या कोणत्याही ॲक्सेसरीजचा वापर करता येऊ शकतो. यामुळे झोपण्यासाठी वापरण्यात येणारे हे आउटफिट नाही असा लूक मिळू शकतो. गबाळेपण दिसू नये यासाठी पायजम्यासोबत नेहमीच स्टाईलिश आणि पॉलिश्ड् ॲक्सेसरीज वापरावीत हे कायम लक्षात ठेवावे. पायजम्यासोबत स्निकर्स किंवा स्टिलीटोज या टाईपचे फुटवेअर निवडावेत. स्लिपर्ससारखे फुटवेअर निवडू नयेत. सोपा मार्ग म्हणजे हिल्सच्या कुठल्याही फुटवेअर अधिक स्टाईलिश दिसू शकते.

**▶ फिटिंग आणि प्रिन्ट :** पायजम्याचे फिटींग हे ओव्हरसाईज्ड नसावे. प्रिन्टमध्ये फ्लोरल, स्ट्राईप्स, ज्योमॅट्रीक आणि सिल्क किंवा इतर ड्रेसी फॅब्रीकवर असतात अशा प्रिन्टची निवड करावी. पायजम्यावर घालण्यात येणारे टॉप हे नेहमी मोठ्या बाह्यांचे असतात, पण थोडेश वेगळेपण आणण्यासाठी स्लिव्हलेस, हॅल्टर किंवा कटआउट स्टाईलचे टॉप घालता येऊ शकतात.

▶ पायजमा हा ट्रेन्ड सध्या नवा असला तरी त्यावर आपल्या वॉर्डरोबमध्ये असणारे वेगवेगळ्या प्रकारचे टॉप्स् घालता येऊ शकतात. पायजमा प्रिन्टेड असेल तर त्यावर स्टाईलिश ब्लाऊज, बटन डाऊन शर्ट किंवा बोल्ड टॅन्क टॉप यापैकी काहीही घालता येते. फुटवेअर म्हणून हिल्स घातला असेल तर हातावर मोठे घड्याळ, सनग्लासेस असा पेहराव करावा. म्हणजे स्लीपवेअर लूक येणार नाही.

**▶ स्टाईलिश कोट किंवा जॉकेट :** पायजमा घातल्यानंतर वेगळा लूक येण्यासाठी त्यावर जॅकेट किंवा कोट सुद्धा घालता येतो. त्यामुळे अधिक पॉलिश्ड् लूक मिळतो. न्यूट्रल शेड मधले ब्लेझर तसेच लेदर जॅकेट यामुळे केवळ स्टाईलिशच नाही तर इंटरनॅशनल फॅशन लूक मिळतो. प्रिन्टेड पायजमा घातल्यानंतर त्यावर सॉलिड कलरचे आउटवेअर घालावे. यामुळे बॅलेन्स्ड् आणि पॉलिश्ड लूक राहतो.

पायजमा विकत घेताना त्याचा लूजनेस, पॉकेट्सवरची पायपींग, सॉफ्ट आणि आरामदायक वाटणारे फॅब्रीक या गोष्टी आवश्य तपासून घ्याव्यात. टिपीकल पायजमा पॅन्टला कलोट्स, पलाझो पॅन्ट्स किंवा वाईड–लेग पॅन्ट्स या चांगला पर्याय ठरु शकतो. स्ट्रक्चर्ड स्टाईल किंवा स्लिक टॉपचा सुद्धा वापर वेगळ्या लूकसाठी सुद्धा करता येऊ शकतो. पायजम्यावर बेल्ट किंवा ब्लेझर घालून आणखी वेगळा लूक मिळवता येऊ शकतो. तसेच अधिक कॅज्युअल लूक साठी जीन जॅकेट, सिम्पल स्ट्राईप्स् शर्ट असा पर्याय देखील वापरता येतो.

## दोस्ती इंग्रजीशी

ladder : **अर्थ : शिडी**
The dog in the circus climbed up the ladder.
**सर्कशीतील कुत्रा शिडीवर चढला.**

half : **अर्थ : अर्धा भाग, निम्मा भाग.**
I'll take half a cup of tea.
**मी अर्धा कप चहा घेईन.**

gardener : **अर्थ : माळी, बागवान**
The gardener does not let us pluck those flowers.
**माळीबाबा आम्हांला ती फुले तोडू देत नाहीत.**

accident : **अर्थ : अपघात**
There was an accident on the main road.
**मुख्य रस्त्यावर एक अपघात झाला.**

## हसरा कोपरा



**बंटीचा निकाल लागला. गणितात शून्य मार्क मिळालेले आईला कसे सांगायचे याचा विचार करत तो घरी आला आणि आईला म्हणाला, आई, गणितात मला शंभराला १ आकडा कमी पडला.
आई : सरळ ९९ मिळाले म्हणून सांग ना.
बंटी : नाही, शंभरातली पुढची दोन शून्य मिळाली.**

## बांगलादेशच्या मागणीला केराची टोपली

# शेख हसीनांना पाठवणार नाही

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेशच्या हंगामी सरकारने शेख हसीना यांना ताब्यात देण्याची मागणी केली आहे. त्या सध्या भारतात आहेत. ५ ऑगस्टनंतर त्या हवाई दलाच्या हेलिकॉप्टरने गाझियाबादमधील हिंडन एअरबेसवर पोहोचल्या आणि तेव्हापासून त्या दिल्लीतील एका ठिकाणी आहेत. गेल्या आठवड्यात बांगलादेशकडून शेख हसीना यांना देशात पाठवण्याची मागणी करणारी राजनैतिक पत्र प्राप्त झाले होते, मात्र भारत सरकारने त्याला प्रतिसाद दिलेला नाही.

दरम्यान, भारत सरकार शेख हसीना यांना परत पाठवण्याचा विचार करत नसल्याचे सरकारी सूत्रांनी सांगितले. एवढेच नव्हे तर बांगलादेश सरकारने दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यानंतरही असा कोणताही निर्णय घेतला जाणार नाही.

पहिली गोष्ट म्हणजे भारताने बांगलादेशसोबत केलेल्या प्रत्यार्पण करारात कोणत्याही राजकीय व्यक्तीच्या परतीचा पैलू नाही. तसेच भूराजकीय कारणास्तव भारताला तसे करायचे नाही. परिस्थिती बदलली तर शेख हसीना यांना सत्ता मिळू शकते आणि त्या स्थितीत त्या सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठरतील, असे भारताला वाटते. त्याचबरोबर बांगलादेशच्या अंतरिम सरकारला राजनैतिक नोटा पाठविण्याशिवाय भारतावर दबाव आणण्याशिवाय पर्याय नाही. शेख हसीना यांनी यापूर्वीच भारतात वेळ घालवला आहे. त्यांचा मुलगा आणि मुलगीही भारतात वास्तव्यास आहेत. शेख हसीना यांना भारतातून बसून बांगलादेशच्या राजकारणावर प्रभाव पाडणेही सोपे जाणार आहे. बांगलादेशातील कट्टरतावादी शक्तींना लगाम घालणाऱ्या शेख हसीना यांचे महत्त्व भारताला मान्य आहे.

### दलाई लामा यांनाही दिला आश्रय

● पाहुण्यांच्या स्वागताची परंपरा दीर्घकाळ जपणारा भारत हा देश आहे. दलाई लामा यांनाही त्यांनी अशाच प्रकारे भारतात येण्याची संधी दिली. दलाई लामा हजारो तिबेटी लोकांसोबत भारतातच आहेत. काही वर्षे थांबावे लागले, तरी शेख हसीना पुन्हा एकदा बांगलादेशात सत्तेवर परत येऊ शकतात, अशी शक्यता आहे.

इन्फोग्राफिक्स

## शिवाजी महाराजांचा दिमाखदार पुतळा उभारणार

### महायुती सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंधुदुर्ग मालवणमधील पुतळा काही दिवसांपूर्वी कोसळला होता. जो पुतळा पडला तो केवळ ८ महिन्यांपूर्वी उभारण्यात आला होता. हा महाराजांचा पुतळा



कोसळल्यानंतर सरकारच्या विरोधात समाजातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. विरोधकांनी यावरून टीका करत सरकारला चांगलंच घेरलं होतं. त्याचबरोबर सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला होता. मात्र या टीकेला सरकार जोरदार उत्तर म्हणून महायुती सरकार लवकरच दिमाखदार पुतळा उभारण्याच्या तयारीत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडला त्यानंतर त्याठिकाणी नवीन भव्यदिव्य पुतळा उभारू असं महायुती सरकारनं आश्वासन दिलं होतं. त्यामुळं आता पुतळ्याच्या चौथऱ्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. हा पुतळा किती फूट उंच असणार? पुतळ्याचं वैशिष्ट्य काय? पुतळ्याचं कशा प्रकारे काम होणार? पुतळा कोण तयार करणार? असे प्रश्न यानिमित्तानं उपस्थित केले जात आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचा सिंधुदुर्गमधील राजकोट येथील पुतळा पडला होता. अत्यंत निकृष्ट दर्जाचा हा पुतळा केला होता. समुद्र किनाऱ्यावर अनेक पुतळे उभारले आहेत. ते आजही डौलाने उभे आहेत. मात्र केवळ ८ महिन्यांपूर्वी उभारलेल्या पुतळ्याचं काम अत्यंत निकृष्ट दर्जाचं केलं होतं. एकनाथ शिंदे यांनी आपल्या मर्जीतील लोकांना कंत्राट दिलं होतं. या कामात मोठा भ्रष्टाचार झाल्याची टीका विरोधकांनी केली होती. त्यामुळेच हा पुतळा पडल्याची टीका विरोधकांनी केली.

» Selected

## डॉ. मनमोहन सिंह यांच्या निधनाने हानी

**मुंबई** : डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाने देशाची हानी झाली आहे. आपली अर्थव्यवस्था मागच्या दहा वर्षात इतके उपद्व्याप टिकून आहे. सध्याच्या सरकारनं आपल्या अर्थव्यवस्थेला इतके सुरुंग लावले तरी ती टिकून आहे. याच सर्व श्रेय डॉ. मनमोहन सिंग यांना जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला विरोधी पक्षातील एक नेता म्हणून आणि अर्थतज्ज्ञ म्हणून मनमोहन सिंग यांनी दिलेले सर्व इशारे आतापर्यंत खरे ठरले आहेत. नोटाबंदीमुळे देशाचा जीडीपी घसरेल, असे मनमोहन सिंग म्हणाले होते. ते खरं ठरलं. असे अनेक इशारे त्यांनी दिले आणि ते खरे ठरले, असे संजय राऊत म्हणाले. देशाचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे गुरुवारी रात्री दिल्लीतील एम्स रुग्णालयात निधन झाल्यानंतर खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे.


## जगातील सर्वात उंच चिनाब रेल्वे पुलाचे काम पूर्ण

**श्रीनगर** : जगातील सर्वात उंच पूल अशी ओळख असणाऱ्या चिनाब पुलाचे काम आता पूर्ण झाले आहे. रेल्वे मंत्रालयाने पत्रकारांचा दौरा या पुलाच्या ठिकाणी आयोजित केला होता.त्यावेळी ही माहिती देण्यात आली आहे.आता या पुलाचे काम पूर्ण झाल्याने २६ जानेवारी रोजी काश्मीर ते कन्याकुमारी हा रेल्वे मार्ग सुरू होण्याची शक्यता आहे. "चिनाब नदीवरील रेल्वे पूल हा केवळ एक पूल नाही, तर भारताच्या तंत्रज्ञान, धैर्य, आणि दृढनिश्चयाचा हा पुरावा आहे. हा पूल स्थानिक जनतेसाठी जीवनरेखा ठरेल आणि जागतिक पातळीवर भारताचे नाव उंचावेल. यामुळे केवळ आर्थिक विकास नाही तर सांस्कृतिक आणि राष्ट्रीय एकात्मतेलाही प्रोत्साहन मिळेल," असे सरकारचे म्हणणे आहे.जम्मू काश्मीरमध्ये सद्या बनिहाल ते संगलदान या उत्तर भागात तर जम्मू ते कटरा अशी दक्षिणेकडे रेल्वे सुरू आहे. कटरा ते संगलदान या मधल्या टप्प्यात रेल्वे सुरू करण्यासाठी चिनाब आणि अंजी हे दोन पूल पूर्ण होणे आवश्यक होते.

## तालिबानने दिली गंभीर परिणामांची धमकी

# पाकच्या भ्याड हल्ल्यांचा बदला घेऊ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** पाकिस्तानने नुकताच अफगाणिस्तानच्या पक्तिका प्रांतात जोरदार हल्ला केला होता. दहशतवादी तळांवर हे हल्ले केल्याचे पाकिस्तानने म्हटले असले, तरी अफगाणिस्तान मात्र संतापला आहे. तालिबानचे परराष्ट्रमंत्री अमीर खान मुताकी यांनी पाकिस्तानला याचे गंभीर परिणाम भोगण्याची धमकी दिली आहे. पाकिस्तानचे हे भ्याड हल्ले आम्ही कधीच विसरू शकणार नाही. त्याचा बदला घेतला जाईल. तालिबानचे नेते म्हणाले की, पाकिस्तानसारख्या देशांनी रशिया, ब्रिटन आणि नाटोकडून शिकले पाहिजे. अफगाणिस्तानने या सर्व देशांना धडा शिकवला.

पाकिस्तानने काळजीपूर्वक विचार करूनच अफगाणिस्तानसंदर्भात कोणतेही पाऊल उचलले पाहिजे. लहान मुलांची हत्या करणे, महिला आणि वृद्धांची हत्या करणे हे शौर्य नाही. लोकांची घरे उद्‌ध्वस्त करण्याचे धाडस नाही. ते म्हणाले की, आज पाकिस्तानमुळे वझिरीस्तानची जनताही बेघर झाली आहे.

तालिबानचे उपपंतप्रधान मौलवी अब्दुल कबीर यांनी काबूल विद्यापीठाच्या एका कार्यक्रमात सांगितले की, आम्ही कोणत्याही दहशतवादी गटाला आमच्या भूमीवरून कारवाया करण्याची संधी दिली नाही. अफगाणिस्तानवर चुकीचा आरोप करण्यात आला असून यामुळे नुकसानच होईल, असे ते म्हणाले.

त्याचबरोबर पाकिस्तानच्या हल्ल्यात डझनभर महिला, वृद्ध आणि लहान मुले ठार झाल्याचेही संयुक्त राष्ट्रसंघाने म्हटले आहे. या हवाई हल्ल्यांमुळे मोठे नुकसान झाले आहे. पाकिस्तानी लष्कराच्या हवाई हल्ल्यांमुळे काही भागात मोठे नुकसान झाले आहे.

तालिबानची कारवाई काय असेल हे अद्याप स्पष्ट झाले नसले तरी बदला घेतला जाईल, असे त्यांच्या नेत्यांचे म्हणणे आहे. अफगाणिस्तानच्या एका राजकीय विश् लेषकाने सांगितले की, पाकिस्तानला इस्लामी तत्त्वांची पर्वा नाही आणि राजनैतिक बाबींनाही महत्त्व देत नाही, हे या हल्ल्यातून दिसून आले आहे.

## कटरा येथे उपोषण सुरूच

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील वैष्णोदेवी मंदिराचा बेस कॅम्प कटरा येथे प्रस्तावित रोप-वे प्रकल्पाविरोधात शुक्रवारी तिसऱ्या दिवशीही बंद सुरूच असून, आंदोलनादरम्यान पोलिसांनी ताब्यात घेतलेल्यांची सुटका करावी, या मागणीसाठी आणखी आंदोलक उपोषणाला बसले आहेत. श्री माता वैष्णोदेवी संघर्ष समितीने बुधवारपासून ७२ तासांच्या बंदची हाक दिली आहे. या कालावधीत कटरा येथील सर्व उपक्रम स्थगित ठेवण्याची घोषणा समितीने केली आहे. या संपामुळे भाविकांना त्रास सहन करावा लागत आहे.

बुधवारी रात्रीपासून सुरू झालेल्या या आंदोलनात आता महिला आणि लहान मुलेही सहभागी झाली असून, या प्रकल्पाविरोधात यापूर्वी काढण्यात आलेल्या मोर्चादरम्यान ताब्यात घेतलेल्या समितीच्या १८ सदस्यांची सुटका करण्यात यावी, अशी त्यांची मागणी आहे.

# काँग्रेस म्हणजे नवी मुस्लीम लीग

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** काँग्रेसच्या बेळगाव येथे होत असलेल्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या पोस्टर्समध्ये पाकव्याप्त काश्मीरला भारताचा भाग दाखवण्यात आलेला नाही. त्यावरून काँग्रेस म्हणजे नवी मुस्लीम लीग असल्याचा टोला भाजपने लगावला आहे.

कर्नाटकातील बेळगाव येथे काँग्रेस कार्यसमितीची दोन दिवसीय बैठक झाली. या बैठकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस कार्यकर्त्यांनी शहरात विविध ठिकाणी काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि खा. प्रियांका गांधी-वाड्रा यांची छायाचित्रे असलेली पोस्टर्स लावली होती. मात्र, या पोस्टर्समध्ये असलेला भारताचा नकाशा हा विकृत पद्धतीने दाखविण्यात आला आहे. या पोस्टर्समध्ये पाकव्याप्त काश्मीर हा भारताचा भाग दाखविण्यात आलेला नाही.

या मुद्द्यावरून भाजप आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी काँग्रेसवर टीकेची झोड उठविली आहे. मालवीय म्हणाले की, काँग्रेस म्हणजे नवी मुस्लीम लीग असून त्यांना पुन्हा भारताचे विभाजन करायचे आहे. बेळगाव येथील आपल्या कार्यक्रमात काँग्रेसने आपल्या सर्व होर्डिंग्जवर भारताचा विकृत नकाशा दाखवला आहे. सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियांका वाड्रा यांच्या छायाचित्रांसह काश्मीर पाकिस्तानचा भाग म्हणून दाखवले आहे. ही चूक असू शकत नाही. हा काँग्रेसच्या लांगूलचालनाचा एक भाग असून त्यांच्या मते भारतीय मुस्लिमांच्या निष्ठा पाकिस्तानसोबत आहेत. सोनिया गांधी या जॉर्ज् सोरोसद्वारे वित्तपुरवठा होणाऱ्या 'फोरम ऑफ डेमोक्रॅटिक लीडर्स इन एशिया पॅसिफिक फाऊंडेशन'च्या सहअध्यक्षा आहेत. त्यामुळे त्यांच्याद्वारे काश्मिरी स्वातंत्र्याचा पुरस्कार करणे स्वाभाविक आहे, असे टीकास्त्र मालवीय यांनी सोडले आहे.

## केरळमध्ये १५२ कोटींची मद्यविक्री

**केरळ :** नाताळ सणानिमित्त केरळ येथे १५२ कोटींहून अधिक किंमतीचे मद्य विकले गेले असल्याचे वृत्त आहे. यावरून केरळ येथे मोठ्या प्रमाणात ख्रिस्ती धर्म असल्याचे दिसून येते. नाताळ सणानिमित्त २४ डिसेंबर २०२४ रोजी ९७ कोटींहून अधिक रूपयांचे मद्य विकले गेले होते. तर नाताळ सणादिवशी २५ डिसेंबर २०२४ रोजी ५५ कोटी रुपयांचे मद्य विकले गेल्याची माहिती समोर आली आहे.

तसेच गतवर्षी नाताळ सणाच्या तुलनेत यंदाच्या नाताळ सणादिवशी मद्यविक्रीमध्ये सुमारे २५ टक्के वाढ झाली आहे. गेल्या वर्षी १२३ कोटी रुपयांचे मद्य विकले गेले होते. केरळमध्ये ख्रिश्चन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. केरळ हे देशातील सर्वाधिक ख्रिस्ती धर्म असलेले राज्य आहे.

## अमेरिकी थेट भेट

पंढरी संचार छायाचित्रसेवा



**अमेरिका :** परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी व्हाईट हाऊसमध्ये अमेरिकी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिव्हन यांची भेट घेतली. या भेटी दरम्यान, दोन्ही नेत्यांनी भारत-अमेरिका धोरणात्मक भागीदारीबद्दल सकारात्मक चर्चा केली.

## देशाने एक उमदा प्रशासक, अर्थतज्ज्ञ गमावला : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाने देशाने एक उमदा प्रशासक, अर्थतज्ज्ञ गमावला आहे, अशी शोकसंवेदना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

आपल्या शोकसंदेशात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, अर्थमंत्री, पंतप्रधान अशा विविध भूमिकांमधून त्यांनी काम केले आणि देशवासियांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. भारताच्या राजकारणात स्वत:चे एक वेगळे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अर्थशास्त्राशी संबंधित विपूल लेखन सुद्धा त्यांनी केले. त्यांनी केलेले कार्य कायम देशवासियांच्या स्मरणात राहील. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या आणि चाहत्यांच्या दु:खात मी सहभागी आहे. हे दु:ख सहन करण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबीयांना लाभो, अशी मी प्रार्थना करतो.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबाबत शोक व्यक्त केला. डॉ मनमोहन सिंग यांनी आधी वित्तमंत्री आणि नंतर पंतप्रधान असतांना देशाच्या आर्थिक विकासाला वेग देणारी दमदार पाऊले उचलली आणि अर्थव्यवस्थेचे दरवाजे खुले करून एक नवी आर्थिक क्रांती आणली.

# अन्नामलाई यांचे ४८ दिवस उपोषण; अण्णा विद्यापीठातील अत्याचार प्रकरणाचा निषेध

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**चेन्नई :** तमिळनाडू राज्याचे भाजपचे प्रमुख के. अन्नामलाई यांनी अण्णा विद्यापीठात झालेल्या अत्याचार प्रकरणी न्याय आणि त्वरीत पोलीस कारवाईच्या मागणीसाठी आंदोलन करण्याबाबतचा वेगळा मार्ग स्वीकारला आहे. २३ डिसेंबर २०२४ रोजी अण्णा विद्यापीठात लैंगिक अत्याचाराची घटना घडली आहे. बाहेरील लोकांनी प्रेयसी आणि तिच्या प्रियकरावर हल्ला करण्यात आल्याचे वृत्त आहे. याप्रकरणी आता के. अन्नामलाई यांनी ४८ दिवस उपोषण करणार असल्याचे त्यांनी २६ डिसेंबर २०२४ रोजी घोषणा केली. तसेच ते ६ वेळा स्वतःला चाबकाने मारतील आणि तामिळनाडूमध्ये द्रमुक सरकार पाडेपर्यंत बूट घालणार नाहीत, अशी घोषणा त्यांनी केली आहे.

अण्णा विद्यापीठात भीतीचे वातावरण तयार झाले आहे. त्यावेळी हल्लेखोर हे विद्यापीठातील नसल्याचे सांगण्यात येत आहे. यावेळी हल्लेखोरांनी प्रियसीसोबत गैरवर्तन केले. तिने परिधान केलेले कपडे उतरवण्याचा प्रयत्न हल्लेखोरांनी केला. त्यावेळी तिचे काही व्हिडिओही काढण्यात आले. याप्रकरणी पीडितेने कोट्टूरपुरम पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती.

दरम्यान, मिळालेल्या अहवालानुसार, आरोपी हा ज्ञानसेकरन हा पुनरावृत्तीचा आरोपी आहे आणि द्रमुकाशी संबंधित आहे. उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन आणि मंत्री एम. सुब्रमण्यम यांच्यासह द्रमुकच्या प्रमुख व्यक्तींसोबतचे फोटो सोशल व्हायरल होत आहेत.

२६ डिसेंबर रोजी के अन्नामलाई यांनी द्रमुक सरकारकडून न्याय मिळावा या मागणीसाठी निषेधाचा एक प्रकार म्हणून ते, ८४ दिवस उपोषण करणार आहेत. तसेच स्वतःला ६ वेळा चाबकाने मारत आणि तामिळनाडू द्रमुक सरकार पडेपर्यंत पायात बूट घालणार नाही, अशी घोषणा केली. ती घोषणा त्यांनी अंमलातही आणली आहे. त्याचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to public at large, that the properties described below belong to Smt. Urmilaraje Shitole, and the owner has decided and agreed to sell her rights to Mr. Sarang Suryawanshi. Any person/s having any claim or right in respect of the said properties by way of inheritance, share, sale, mortgage, lease, lien, license, gift, possession or encumbrance howsoever or otherwise is hereby required to intimate to the undersigned within 7 days from the date of publication of this notice of any such claim, if any, with all supporting documents, failing which the transaction shall be completed without reference to such claim, and the claims if any, of such person/s shall be treated as waived and not binding on our clients.Description of Property: All the piece and parcel affected/ reserved by 18 Mtrs. D.P. Road within the properties having Survey Nos: 13/4A (C.T.S. No:1264) and 6/2D, all situated within the limits of the Pimpri Chinchwad Municipal Corporation (P.C.M.C) and within the jurisdiction of Sub Registrar Haveli, situated at Village: Sanghvi, Taluka: Haveli, Zilla: Pune

Pune
Date: - 28/12/2024

ADV. VIKRANT RAJA SURYAWANSHI
Pwd 13/5, Ayyappa Temple Road, Pimpri Colony, Pimpri, Pune- 411017 Mob : 8983000333

# दिल्ली विधानसभेसाठी रालोआची एकजूट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** आगामी दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील (रालोआ) घटकपक्षांसोबत उतरण्याची तयारी केली आहे. ही एकजूट आम आदमी पार्टी(आप) साठी धोक्याची घंटा ठरणार आहे.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय आरोग्यमंत्री जगतप्रकाश नड्डा यांच्या निवासस्थानी बुधवारी रालोआ नेत्यांची बैठक झाली. बैठकीत हरियाणा आणि महाराष्ट्रातील विजयाबद्दल अभिनंदन करण्यात आले. त्याचवेळी झारखंडमधील पराभवाविषयी चर्चा करण्यात आली. या बैठकीत दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या रणनीतीवरही चर्चा झाली. दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी भाजपने मित्रपक्षांच्या प्रमुख नेत्यांना आमंत्रित केले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री जितन राम मांझी आणि चिराग पासवान आदी दिल्लीत रालोआचा प्रचार करू शकतात.

दिल्लीतील पूर्वांचली मतदारांना मोठ्या संख्येने आपल्या गोटात आणण्यासाठी रालोआचे बिहारमधील नेते प्रयत्न करतील. दिल्लीत पूर्वांचली मतदारांची संख्या सर्वाधिक आहे. बिहार, पूर्व उत्तर प्रदेश आणि झारखंडमधील सुमारे २५ टक्के मतदार दिल्लीत आहेत आणि दिल्लीतील २० जागांवर पूर्वांचली मतदारांची चांगली पकड आहे. हे मतदार प्रामुख्याने गोकलपूर, मतियाला, द्वारका, नांगलोई, करावल नगर, जनकपुरी, त्रिलोकपुरी, बुराडी, उत्तम नगर, संगम विहार, जनकपुरी, त्रिलोकपुरी, किरारी, विकासपुरी आणि समयपूर बदली या विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रभावी आहेत. त्यांना साधण्यासाठी भाजप चिराग पासवान, नितीश कुमार आणि जीतन राम मांझी यांना निवडणूक प्रचारात उतरवू शकते.

## ८ जानेवारी पर्यंतचा विस्तारित हवामान अंदाज जाहीर

# एकीकडे थंडीचा कडाका, दुसरीकडे पाऊस

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क


**नवी दिल्ली :** यंदा थंडीचा हंगाम जोरात सुरू आहे. त्याचवेळी एकीकडे कडाक्याची थंडी आणि दाट धुक्यामुळे जनजीवन विस्कळीत होत आहे, तर दुसरीकडे अनेक भागात पावसाने हजेरी लावली आहे. भारतीय हवामान शास्त्र विभागाने ८ जानेवारी पर्यंतचा विस्तारित हवामान अंदाज जाहीर केला. हिवाळा, पाऊस आणि धुक्याशी संबंधित महत्त्वपूर्ण माहितीचा यात समावेश आहे.

उत्तर भारतातील मैदानी भागात थंडीची लाट कायम आहे. हिमाचल प्रदेश, पंजाब आणि जम्मू-काश्मीरमध्ये थंडीचा इशारा देण्यात आला आहे. राजस्थानमधील चुरू येथे या मोसमातील सर्वात कमी तापमानाची नोंद झाली आहे. दाट धुक्यामुळे दिल्ली, हरयाणा आणि उत्तर प्रदेशातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. २६ ते ३१ डिसेंबर दरम्यान धुके तीव्र होण्याची शक्यता आहे.

पंजाब, हरयाणा, राजस्थान आणि उत्तर प्रदेशच्या काही भागात गारपीट आणि वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता असून, या काळात तापमानातही घट होणार आहे. उत्तर आणि पश्चिम भारतातील किमान तापमानात पुढील दोन दिवसांत दोन अंशांची घट होण्याची शक्यता आहे. मध्य भारत आणि पूर्व भारतातील काही भागात तापमान सरासरीपेक्षा किंचित अधिक राहण्याची शक्यता आहे. पश्चिम विक्षोभामुळे हिमाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मीरमध्ये थंडीची लाट आणि बर्फवृष्टी कायम राहणार आहे.

### दक्षिण भारतात पावसाचा जोर वाढला

● गेल्या आठवड्यात तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि ओडिशामध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे हवामानात बदल झाला. या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे या भागात मेघगर्जनेसह पाऊस झाला. तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि आंध्र प्रदेशात पुढील काही दिवस हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. दक्षिण भारतात मान्सूनोत्तर पाऊस सरासरीपेक्षा १५ टक्के अधिक झाला आहे.





तीन सामन्यांनंतर मालिका १-१ बरोबरीत आहे. बॉर्डर-गावसकर ट्रॉफी अजूनही तुमची अजून झाली नाही. तुम्हाला मेलबर्नमध्ये जिंकायचेच आहे, त्यामुळे हे सर्व. मी ऑस्ट्रेलियात हे खूपदा पाहिले आहे, त्यांच्या संघाच्या पाठीशी संपूर्ण देश उभा राहतो.

— रवि शास्त्री

'इथले मिडिया आणि माजी ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू दुहेरी भूमिका घेत आहेत. तुम्ही एकदा त्याला किंग म्हणता आणि त्याने थोडं आक्रमक झालं की त्याला असं बोलता.' 'आम्ही देखील विराटच्या आक्रमकपणाला पाठिंबा दिला नव्हता.

— इरफान पठाण



## भारत १६४/५; फॉलोऑन वाचवण्यासाठी आणखी १११ धावांची गरज

# भारतावर फॉलो ऑनचे संकट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मेलबर्न :** ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ४७४ धावांपर्यंत मजल मारली. पण ऑस्ट्रेलियन गोलंदाजी समोर भारताची आघाडी फलंदाजी पुर्णत: फसली. रोहित-विराटने पुन्हा तिच चूक केली. तर यशस्वी जैस्वाल शतकाच्या जवळ पोहोचला असताना चुकीच्या कॉलमुळे धावबाद झाला. भारताचा निम्मा संघ १५९ धावांवर माघारी परतला आणि भारतावर फॉलोऑनचे संकट निर्माण होण्यास सुरूवात झाली.

रोहित शर्माने पुन्हा तिच चूक केली. तो पुन्हा चुकीच्या शॉट सिलेक्शचा शिकार बनला. रोहितने अवघ्या तीन धावा बनवल्या व शॉर्ट बॉलवर खेळलेल्या चुकीच्या फटक्याने त्याला तंबूत परतायला भाग पाडले. त्यानंतर केएल राहुल व यशस्वी जैस्वालने भागीदारी उभारण्याचा प्रयत्न केला, पण केएल राहुल बचावाच्या प्रयत्नात असताना चेंडूने थेट स्टंप्सचा वेध घेतला. केएल राहुलने जैस्वालला



२४ धावांची साथ दिली.

त्यानंतर विराट कोहली व यशस्वी जैस्वालने चांगली भागीदारी केली. जैस्वालने आपले अर्धशतक पुर्ण केले, त्यानंतर संथ खेळीसह जास्त जोखीम न घेता दोघेही धावसंख्येत भर टाकत राहीले. दोघांनी शतकी भागीदारी पुर्ण केली, यशस्वी जैस्वाल चांगल्या लयमध्ये होता. पण एक चूक दोघांच्या भागीदारीसाठी, भारतीय संघासाठी आणि जैस्वालसाठी महागात पडली. विराट व जैस्वालमधील चूकीच्या कोऑर्डिनेशनमुळे जैस्वाल ८२ धावांवर माघारी परतला आणि विराट जैस्वालच्या शतकी भागीदारीला १०२ धावांवर ब्रेक लागला.

त्यानंतर विराट कोहली देखील पाचव्या स्टंपच्या चेंडूचा शिकार बनला. त्याने पुन्हा तो चेंडू खेळाला आणि नेहमीप्रमाणे झेलबाद झाला. त्याने ८६ चेंडूत ३६ धावा बनवल्या. त्यानंतर पाचव्या क्रमांकावर आलेला आकाश दीपला भोपळा फोडता आला नाही.

भारताने ४७४ धावांच्या प्रत्युत्तरात दुसऱ्या दिवसाअंती ५ बाद १६४ धावा केल्या. सध्या ऋषभ पंत ६ व रविंद्र जडेजा ४ धावांवर नाबाद आहेत. भारत अजूनही सामन्यात ३१० धावांनी पिछाडीवर असून भारताला फॉलोऑन वाचवण्यासाठी १११ धावांतची आवश्यकता आहे.

### ऑस्ट्रेलियन मीडियाचा कोहलीवर निशाणा

● बॉक्सिंग डे कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी पदार्पणवीर सॅम कॉन्स्टास दोन कारणांसाठी चर्चेत राहिला. पहिलं कारण म्हणजे त्याने



पदार्पण सामन्यात फटकेबाजीसह ठोकलेल्या अर्धशतकामुळे व दुसरे कारण म्हणजे त्याच्या विराट कोहली सोबतच्या राड्यामुळे. डावाच्या १० व्या षटकानंतर विराट व सॅम कॉन्स्टास यांच्यात टक्कर पाहायला मिळाली व दोघांमध्ये शाब्दिक बाचाबाची देखील झाली. त्यानंतर सोशल मीडियावर मिम्सचे वादळ उठले. अनेकांनी कोहलीवर टीका केली, तर काहींनी त्याची बाजूही घेतली. अशातच ऑस्ट्रेलियन मीडियानेही विराट कोहलीवर निशाणा साधला आहे. ज्या ऑस्ट्रेलियन मीडियाने विराट कोहलीचे जंगी स्वागत केले होते, त्याच मीडियाने आज विराटवर टीकास्त्र सोडले आहे.

● विराटचा न्यूजपेपरमध्ये जोकर स्टाईल फोटो प्रिंट करत त्यावर 'विदूषक कोहली' असे टायटल दिले आहे. 'युवा स्वप्नांच्या कसोटी पदार्पणाचा भारताच्या घाबरट खेळाडूला दयनीय धक्का' असा त्यावर मजकूर छापला आहे. दोघांमधील या भांडणांनतर भारतीय माजी खेळाडूंनीही विराटचे कान टोचले. माजी क्रिकेटपटू व माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी विराटला असं करण्याची काहीच गरज नव्हती म्हणत, त्याला सुनावले.

### दिवी, त्वेशा, अनया, अद्विक यांची विजयी सलामी

**पुणे :** महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटना यांच्या वतीने आयोजित व जागतिक बुद्धिबळ महासंघ(फिडे), भारतीय बुद्धिबळ महासंघ(एआयसीए) यांच्या मान्यतेने होत असलेल्या 37व्या ९ वर्षाखालील खुल्या व मुलींच्या राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत पहिल्या फेरीत दिवी ब्रिजेश, त्वेशा जैन, अनया शार्मा, अद्विक अग्रवाल यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून विजयी सलामी दिली.

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील बॉक्सिंग हॉलमध्ये आजपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत मुलींच्या गटात पहिल्या फेरीत केरळच्या दिवी ब्रिजेशने ओडिशाच्या अनन्या मिश्राचा, तर महाराष्ट्राच्या त्वेशा जैनने आपली राज्य सहकारी अनन्या चव्हाणचा पराभव करून १ गुणांची कमाई केली. तेलंगणच्या अनया शार्माने अनिका लक्ष्मी पीचा पराभव करून विजयी सलामी दिली. खुल्या गटात महाराष्ट्राच्या अद्विक अग्रवालने युवान रमणचा पराभव करून 1गुण मिळवला. ओडिशाच्या सात्विक स्वेनने किर्थन आयाम केवर विजय मिळवला. तेलंगणाच्या दिविथ अदुल्लाने कविश अग्रवालचा पराभव करून १ गुण प्राप्त केला.

### महाराष्ट्राचा मेघालयवर विजय; सिद्धेश वीरची अष्टपैलू चमक

**नवी दिल्ली :** गोलंदाजांच्या भेदक कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्राने मेघालयचा नऊ विकेट आणि २१४ चेंडू राखून धुव्वा उडवला आणि विजय



हजारे करंडक क्रिकेट स्पर्धेत सलग तिसरा विजय मिळवला. नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या मेघालयचा डाव ३७.१ षटकांत ११३ धावांत गुंडाळल्यानंतर महाराष्ट्राने हे आव्हान १४.२ षटकांत पार केले आणि ब गटात १२ गुणांसह पहिले स्थान कायम ठेवले आहे. विजयासह सरासरीही अधिक चांगली करण्याची समोर आलेली संधी महाराष्ट्राच्या सलामीवीरांनी साधली. गेल्या सामन्यात शतकी खेळी करणारा ऋतुराज गायकवाड आज सलामीला आला नाही. ओम भोसले आणि सिद्धेश वीर यांनी सलामी केली आणि १६.५ षटकांत ९७ धावा फटकावल्या. ओम भोसले ४६ धावांवर बाद झाला तर सिद्धेश वीरने नाबाद ५७ धावा केल्या. सिद्धेशने गोलंदाजीतही तीन विकेटचे योगदान दिले. महाराष्ट्राकडून सत्यजित बच्छाव आणि रजनीश गुरबानी यांनीही प्रत्येकी दोन विकेट मिळवल्या. महाराष्ट्राचा पुढचा सामना हिमाचल प्रदेशविरुद्ध होणार आहे.

### कामरान गुलामने आफ्रिकेच्या खेळाडूंना केली शिवीगाळ




**नवी दिल्ली :** भारत-ऑस्ट्रेलियाप्रमाणेच दक्षिण आफ्रिका आणि पाकिस्तान यांच्यात बॉक्सिंग डे कसोटी सामना खेळवला जात आहे. पहिल्याच दिवशी पाकिस्तानचा संघ २११ धावा करत सर्वबाद झाला. सेंच्युरियन कसोटीच्या पहिल्या दिवसाच्या खेळात एकूण १३ विकेट पडल्या असताना, मैदानावर खेळाडूंमध्ये शिवीगाळही पाहायला मिळाली. कामरान गुलामने या सामन्यात ५४ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली पण त्याने या सामन्यात आफ्रिकेच्या दोन खेळाडूंना शिवीगाळ केल्याने चर्चेत आहे. सेंच्युरियनमध्ये खेळल्या जात असलेल्या कसोटी सामन्यात कामरान गुलाम फलंदाजी करत असताना प्रथम आफ्रिकन संघाचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडाशी वाद घालताना दिसला आणि त्यानंतर त्याने काही अपशब्दही वापरले. कामरान इथेच थांबला नाही आणि रबाडानंतर त्याचा आफ्रिकेचा विकेटकिपर काइल व्हर्नीसोबत वाद झाला ज्यामध्ये त्यालाही उत्तर मिळाले. व्हर्नीबरोबर बोलताना त्याने पुन्हा पुन्हा त्याच्या चेहऱ्याकडे पाहत शिवी दिली, ज्याचा व्हीडिओही चांगलाच व्हायरल होत आहे. यापूर्वीही कामरानला मैदानावर आपला राग आवरता आलेला नाही. पाकिस्तानकडून कामरान गुलामने सर्वाधिक धावा केल्या. मात्र मैदानावरील त्याच्या या वागण्यामुळे तो ट्रोल झाला आहे.

## स्पोर्टीक्यु फुटबॉल, अशोका फुटबॉल, सिंग्मय एफसी, यंग स्टेप्स् संघांची शानदार सुरूवात !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आर. एम. स्पोर्टस कन्सेप्ट्स आणि पुणे जिल्हा फुटबॉल संघटना (पीडीएफए) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पीडीएफए युथ लीग' फुटबॉल स्पर्धेत स्पोर्टीक्यु फुटबॉल ॲकॅडमी, अशोका फुटबॉल क्लब, सिंग्मय एफसी आणि यंग स्टेप्स् ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून शानदार सुरूवात केली.

रहाटणी येथील स्पोर्टझी अरेना मैदानावर झालेल्या या स्पर्धेत स्पोर्टीक्यु फुटबॉल ॲकॅडमीने रायन सॉकर ॲकॅडमीचा डझनभर गोलने सहज पराभव केला. स्पोर्टीक्यु फुटबॉल ॲकॅडमीकडून समर्थ कुंभार याने सर्वाधिक ४ गोल केले. शोर्य मोहोळ, स्वराज शिंदे आणि सोहम दळवी यांनी प्रत्येकी दोन गोल केले. वेदस्वा कावडे आणि स्वराज काकडे यांनी प्रत्येकी एकेक



गोल केले. दुसऱ्या सामन्यामध्ये अशोका फुटबॉल क्लबने आर्यन सॉकर ॲकॅडमीचा १४-१ असा धुव्वा उडविला. अशोका संघाकडून राघव शेखावत याने ५ गोल तर, शौर्य नवाघाणे याने ४ गोल केले. अर्णव राव, अर्णव बच्चोरे आणि इशान जोशी यांनी प्रत्येकी दोन गोल केले. सिंग्मय एफसी संघाने यंग स्टेप्स् ॲकॅडमीचा ८-३ असा एकतर्फी पराभव करून विजयी सलामी दिली. सिंग्मय संघाकडून काव्या ठक्कर, आरव चौहान आणि ऋषभ कमाने यांनी प्रत्येकी दोन गोल केले. याशिवाय पार्थ मुरदरे आणि सोहम डेंगदर यांनी प्रत्येकी एकेक गोल केला.

### 'तो ऑस्ट्रेलियाचा भावी सेहवाग...'

**मेलबर्न :** मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉक्सिंग डे कसोटी खेळली जात आहे. रवी शास्त्री यांनी सॅम कॉन्स्टन्सची तुलना भारताचा माजी दिग्गज वीरेंद्र सेहवागशी केली आहे. रवी शास्त्री मानतात की सॅम कॉन्स्टन्सची बॅट ज्या प्रकारे स्विंग करते, ती वीरेंद्र सेहवागशी मिळतेजुळते आहे. तो ऑस्ट्रेलियाचा भावी सेहवाग ठरेल. स्टार स्पोर्ट्सवर बोलताना शास्त्री यांनी कॉन्स्टासच्या निर्भय स्ट्रोक खेळण्याचे कौतुक केले आणि त्याची तुलना सेहवागच्या स्फोटक शैलीशी केली. शास्त्री म्हणाले, "त्याला प्रसंगी काही अपयश येईल, पण जेव्हा तो लयीत येतो तेव्हा तो मनोरंजनासाठी तयार असतो."

माजी भारतीय प्रशिक्षक म्हणाले की, बॉलर्सवर वर्चस्व गाजवण्याची आणि त्याच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या संधींचा फायदा घेण्याची कॉन्स्टसची क्षमता सेहवागच्या आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढ झाल्यापासून त्याच्या प्रभावाचे प्रतिबिंब आहे.

## दीप्ती शर्मा, रेणुका सिंगच्या गोलंदाजीवर विंडीज फसली

# भारताकडून वेस्ट इंडिजला व्हाईट वॉश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय महिला संघाने वेस्ट इंडिजला ट्वेंटी-२० मालिकेल व्हाईट वॉशनंतर आता वन-डे मालिकेतही व्हाईट वॉश दिला आहे. भारतीय महिला संघाने अंतिम वन-डे सामन्यात वेस्ट इंडिजला विकेट्सने पराभूत केले व मालिका ३-० ने जिंकली. दिप्ती शर्माने ६ विकेट्स व रेणुका सिंगने ४ विकेट्स घेत वेस्ट इंडिजचा डाव १६२ धावांवर गुंडाळला आणि भारतीय संघाने १६३ धावांचे लक्ष्य २८.२ षटकांत पूर्ण करत सामन्यात बाजी मारली.

प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या वेस्ट इंडिजला पहिल्याच षटकात रेणुका सिंगने २ धक्के दिले. सलामीवीर क्विना जोसेफ व हेली मॅथ्यूजला शून्यावर माघारी पाठवले. चौथ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेल्या डिएंड्रा डॉटीनलाही रेणुका सिंगने बोल्ड



करत ५ धावांवर माघारी पाठवले. पण त्यानंतर शेमेन कॅम्पबेल व चिनेल हेन्रीने चौथ्या विकेटसाठी ९१ धावांची भागीदारी केली. २२ व्या षटकात शेमेन कॅम्पबेल दिप्ती शर्माने ४६ धावांवर बाद केले आणि त्यांच्या भागीदारीला ब्रेक लागला व तिचे अर्धशतक ४ धावांनी हुकले.

त्यानंतर वेस्ट इंडिजचा डाव पुन्हा घसरला. वेस्ट इंडिजच्या अवघ्या तीन खेळाडूंनी दुहेरी धावा बनवल्या. ज्यामध्ये शेमेन कॅम्पबेल व चिनेल हेन्री यांच्यासह मएलियाह एलेने हीने २१ धावांचे योगदान दिले. यांच्याव्यतिरिक्त वेस्ट इंडिजच्या कोणत्याच खेळाडूंनी मोठी खेळी केली नाही. दिप्ती शर्माने व रेणुका सिंग यांनी ३८.५ षटकांत वेस्ट इंडिजचा डाव गुंडाळला.

भारताने १६३ धावांच्या प्रत्युत्तरात भारतीय संघ आक्रमक रणनीतीसह मैदानात उतरला. मोठा फटका खेळायच्या नादात स्मृती मानधना ४ धावांवर झेलबाद झाली. प्रतिका रावलने यावेळी १८ धावांचे योगदाने दिले. मागच्या सामन्यातील शतकवीर हर्लिन देओलला एका धावेवर माघारी परतावे लागले.

### क्रिशु नाईट्सची विजयाची हॅट्रिक

**पुणे :** क्रिककिंगडम यांच्या वतीने आयोजित तिसऱ्या क्रिककिंगडम चॅम्पियन्स करंडक १६ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत क्रिशु नाईट्स संघाने आपली विजयी मालिका कायम ठेवत तिसरा विजय मिळवला. शापूर्जी पालोनजी मैदान व वीरांगना क्रिकेट मैदान या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत तरुण एस(२-१६ व नाबाद ६६) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर क्रिशु नाईट्स संघाने सिंगापूर थंडरबोल्ट संघाचा ७ गडी राखून पराभव करत तिसऱ्या विजयाची नोंद केली. दुसऱ्या लढतीत पृथ्वी राज(४-८) याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर ओडीएम ग्लॅडिएटर्स रांची संघाने ओडीएम ब्लास्टर्स भुवनेश्वर संघाचा ८ गडी राखून पराभव करत दुसरा विजय मिळवला. विशेष म्हणजे पृथ्वी राजने हॅट्रिक कामगिरी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

# ऋत्वा पांडे, हृदय पाडवे यांचा मानांकित खेळाडूंना धक्का

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सुधांशु बॅडमिंटन अकादमी यांच्या वतीने आयोजित डेक्कन जिमखाना पुरस्कृत योनेक्स सनराईज एसबीए कप जिल्हास्तरीय सुपर १०० मानांकन बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत ऋत्वा पांडे, हृदय पाडवे यांनी आपापल्या गटातील मानांकित खेळाडूंना पराभवाचा धक्का देत आगेकूच केली.

डेक्कन जिमखाना बॅडमिंटन कोर्ट या ठिकाणी सुरु असलेल्या या स्पर्धेत ११ वर्षाखालील मुलींच्या गटात दुसऱ्या फेरीत बिगरमानांकित ऋत्वा पांडेने तिसऱ्या मानांकित कियारा साखरेचा १५-९, १५-१० असा पराभव करून सनसनाटी निकाल नोंदवला. सहाव्या मानांकित स्वरा कुलकर्णीने अन्वी कुलकर्णीचा







१३-१५, १५-८, १५-८ असा तीन सेटमध्ये पराभव केला.

१५ वर्षांखालील मुलांच्या गटात दुसऱ्या फेरीत चुरशीच्या लढतीत हृदय पाडवेने सातव्या मानांकित सिबतैनराझा सोमजीचा ८-१५, १५-१३, १५-७ असा संघर्षपूर्ण पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदवला. आरव रायने प्रतीक शितोळेचा १५-८, १५-१० असा पराभव केला. पाचव्या मानांकित विराज सराफ याने जयंत झाडेचा १५-१०, १०-१५, १५-१३ असा पराभव करून आगेकूच केली. तेराव्या मानांकित अनय एकबोटेने नचिकेत गोखलेचा १५-१०, १५-६ असा तर, अथर्व गवळीने कृतार्थ यादवचा १५-९, १५-११ असा पराभव करून तिसऱ्या फेरीत धडक मारली.

## केपीआयटीचा दसॉल्ट सिस्टिम्सवर दणदणीत विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आयडीयाज-अ-सास कंपनी यांच्या वतीने व कोलते-पाटील डेव्हलपर्स लिमिटेड यांच्या सहकार्याने आयोजित १९व्या अंकुर जोगळेकर मेमोरियल आंतर आयटी कप क्रिकेटअजिंक्यपद स्पर्धेत साखळी फेरीत शुभम झापडेकर(नाबाद १०९), मंगेश पाटील(१३९धावा) यांनी केलेल्या धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर केपीआयटी संघाने दसॉल्ट सिस्टिम्स संघावर १६७धावांनी विजय मिळवला.

पीसीएमसी येथील व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट अकादमी मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत पहिल्या लढतीत प्रथम फलंदाजी करताना केपीआयटी संघाने २० षटकात 1बाद २५७ धावा केल्या. यात मंगेश पाटीलने ६३चेंडूत१२ चौकार व ११ षटकाराच्या मदतीने १३९ धावांची खेळी केली. त्याला शुभम झापडेकरने ५७ चेंडूत १९ चौकार व १ षटकारासह नाबाद १०९ धावा काढून साथ दिली. या जोडीने पहिल्या विकेटसाठी ११९ चेंडूत २५५ धावांची भागीदारी करून संघाच्या डावाला आकार दिला. याच्या उत्तरात दसॉल्ट सिस्टिम्स संघ १८.१ षटकात सर्वबाद ९० धावावर संपुष्टात आला. यात पियूष सावंत ३०, अभिराम एचआर १६ यांनी थोडासा प्रतिकार केला.

### पृथ्वी क्रिकेट, वैभव क्रिकेट यांच्यात विजेतेपदासाठी लढत !

**पुणे :** कमोडोर एल.एस. मेहता यांच्या स्मरणार्थ आयोजित 'गुरू विजय दळवी करंडक' १४ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब २५-२५



षटकांच्या क्रिकेट २०२४ स्पर्धेत पृथ्वी क्रिकेट ॲकॅडमी आणि वैभव क्रिकेट ॲकॅडमी संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. धानोरी येथील डी.एन.परांडे स्पोर्ट्स हब मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत अथर्व बोडके याने केलेल्या शतकी खेळीमुळे पृथ्वी ॲकॅडमीने २२ यार्ड्स् ॲकॅडमीचा ८८ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या पृथ्वी क्रिकेट ॲकॅडमीने २५ षटकात १९८ धावा चोपल्या. अथर्व बोडके याने ८१ चेंडूत १८ चौकार आणि १ षटकारांसह नाबाद ११५ धावांची खेळी केली. त्याने युवराज मोरे (३५ धावा) याच्यासाथीत ८४ चेंडूत ९९ धावांची सलामी दिली. त्यानंतर पृथ्वीराज खांडवे (नाबाद ३४ धावा) याच्यासह ९९ धावांची अभेद्य भागिदारी रचली. याला उत्तर देताना २२ यार्ड्स् ॲकॅडमीचा डाव ११० धावांवर मर्यादित राहीला. आर्यन ताकवणे याने केलेल्या ६३ धावांच्या जोरावर वैभव क्रिकेट ॲकॅडमीने व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट ॲकॅडमीचे आव्हान ३२ धावांनी मोडून काढले आणि अंतिम फेरी गाठली. आर्यन याने केलेल्या धावांमुळे पहिल्यांदा खेळताना वैभव संघाने १७५ धावा धावफलकावर लावल्या.

## स्मिथची विक्रमी कामगिरी! भारताविरुद्ध 'अशी' कामगिरी; बनला अव्वल फलंदाज

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मेलबर्न :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळल्या जात असलेल्या चौथ्या कसोटी सामन्यात स्टीव्ह स्मिथने शतक झळकावून विशेष कामगिरी नोंदवली. त्याचे हे कसोटी कारकिर्दीतील ३४ वे शतक असून सध्या सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीतील सलग दुसरे शतक ठरले आहे. यासोबतच त्याने भारताविरुद्ध एक मोठा विक्रमही आपल्या नावावर केला आहे. तो भारताविरुद्ध कसोटीत सर्वाधिक शतके झळकावणारा फलंदाजही बनला आहे.

स्टीव्ह स्मिथने मेलबर्न येथे सुरू असलेल्या बॉक्सिंग डे कसोटी



सामन्याच्या दुसऱ्या दिवशी आपले शतक पूर्ण केले. त्याने १६७ चेंडूंचा सामना करत कसोटी कारकिर्दीतील ३४ वे शतक पूर्ण केले. यादरम्यान त्याने ९ चौकार आणि ४ षटकार मारले. यापूर्वी त्याने गाबा येथीक तिस-या कसोटीतही शतकी खेळी साकारली होती.

भारताविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकावण्याच्या बाबतीत त्याने आता जो रूटला मागे टाकले आहे. जो रूटने भारताविरुद्ध १० कसोटी शतके झळकावली आहेत. तर रिकी पाँटिंग, गॅरी सोबर्स आणि व्हिव्ह रिचर्ड्स यांनी ८-८ शतके झळकावली होती.

ऑस्ट्रेलियाचा स्टार फलंदाज स्टीव्ह स्मिथने ३४ वे शतक झळकावताच अनेक मोठे विक्रम नोंदवले. त्या २०१ च्या डावात आपले ३४ वे शतक पूर्ण केले. सर्वात कमी डावात ३४ वे शतक पूर्ण करणारा तो जगातील तिसरा फलंदाज ठरला. यापूर्वी सचिन तेंडुलकरने १९२ डावांमध्ये आणि रिकी पाँटिंगने १९३ डावांमध्ये ही कामगिरी केली होती.

## १७३ किलोमीटर अंतर १९ धावपटूंनी केवळ १८ तासात केले पूर्ण

# टीम स्पोर्टीफाय तर्फे पुणे ते मुंबई रन वे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** टीम स्पोर्टीफाय रनिंग ग्रुपने धानोरी ते मुंबई धावण्याच्या शर्यतीचे आयोजन केले होते. या रिले शर्यतीचा उद्देश पुण्यातील चेतना फाऊंडेशन या एन.जी.ओ.मध्ये विशेष गरज असलेल्या विशेष मुलांसाठी निधी उभारणे हा आहे.यापूर्वी संघाने २०२३, २०२२ आणि २०२१ अनुक्रमे धानोरी ते पाचगणी,धानोरी ते जेजुरी आणि धानोरी सिंहगड किल्ला रिले शर्यतीचे आयोजन केले होते.

या शर्यतीत १९ धावपटू



होते आणि १७३ किलोमीटर अंतर १८ तासांत पूर्ण केले.या रिले शर्यतीचा मार्ग पुण्यातील धानोरी, विश्रांतवाडी,खडकी, चिंचवड, लोणावळा, खोपोली, पनवेल,वाशी,चेंबूर,गेट वे ऑफ इंडिया मुंबई असा होता.

आकाश होळकर,अरुण अकेला,आशिष पठाडे,हितेश सिरोया,किरण मोरे,कुणाल उपाध्ये, लक्ष्मीकण्डन,मंगेश थोरात,मनोज कल्याण,नीरज नागर,निखिल राऊत,प्रज्ञा इंगळे,रोहित परदेशी,सत्या उपाध्याय, शैलेश कोल्हे,श्वेता खेराज, श्रीकांत नुला, वैभव नेहे, विजय बनसोड या रिले शर्यतीत सहभागी झाले होते.

प्रशिक्षक विजय बनसोड यांनी हा कार्यक्रम यशस्वी करणाऱ्या धावपटू,समर्थक आणि स्वयंसेवकांचे आभार मानले. "धावणे म्हणजे फक्त फिटनेस नाही, समुदायांना एकत्र आणण्याचा आणि फरक करण्याचा हा एक मार्ग आहे,"